चरित्र
रामायण

Sanskruti Samvardhan Pratishthan
संस्कारेणैव हि संस्कृति

नैतिक शिक्षण योजना

ज्यांच्या अमोल सहकार्यामुळे नैतिक शिक्षण योजनेचा हा उपक्रम यशस्वी होत आहे आणि संस्कारक्षम वयात मुलांना रामायण, महाभारताची गोडी लागत आहे. अशा सर्व शिक्षक, मुख्याध्यापक आणि शाळासंचालकांना...

कृतज्ञतापूर्वक धन्यवाद!

लेखिका :
श्रीमती कल्याणीरमण बेन्नुरवार

***

प्रकाशक :
श्री. मोहन सालेकर
संस्कृति संवर्धन प्रतिष्ठान
७२/२, खटाव टेरेस,
डॉ. एस्. एस्. राव मार्ग,
लालबाग,
मुंबई - ४०० ०१२.
दूरध्वनी - ०२२-२४७१७६८६

***

मुखपृष्ठ व सजावट :
श्री. चंद्रशेखर जोशी

संपादक मंडळ
डॉ. श्रीमती कीर्तिदा मेहता
श्री. बाळकृष्ण भागवत
डॉ. चारुशीला ओक
श्रीमती अलका गोडबोले

अकरावी आवृत्ती :
दि. १९ जुलै, २०१६
सहयोगी मूल्य : रु. १५०/-

मुद्रक :
इंडिगो प्रेस (इं) प्रा.लि.,
१सी/७१६,दादोजी कोंडदेव क्रॉस रोड,
भायखळा (पूर्व),
मुंबई-४०० ०२७

सर्वाधिकार प्रकाशकाधीन

प्रस्तावना

'रामायण' आणि **'महाभारत'** हे केवळ भारताचेच नव्हेत तर संपूर्ण विश्वाचे आदर्श ग्रंथ मानले जातात. रामायण म्हणजे प्रभू रामचंद्रांचा जीवनपट. त्यांचे अधिराज्य ते रामराज्य. असे रामराज्य यावे ही प्रत्येकाची इच्छा असते. रामराज्य म्हणजे एक सुखी समाधानी राज्य, जिथे हेवेदावे नाहीत, खून दरोडे नाहीत, एकमेका सहाय्य करू अवघे धरू सुपंथ असेच सर्वजण वागतात. प्रत्येकाच्या अन्न, वस्त्र, निवारा या मुलभूत गरजा पुरवल्या जातात त्याचबरोबर सर्व लोक आनंदी असतात ते रामराज्य. मग हे प्रभू रामचंद्र होते तरी कसे? त्यांच्यावर कौसल्या मातेने कसे संस्कार केले? ज्यायोगाने त्यांनी सचोटी, सहिष्णुता, सहनशीलता, सामंजस्य हे गुण संपादनकेले.

आजच्या २१ व्या शतकात माहिती तंत्रज्ञानाच्या महाजालात गुंतलेले आपण ज्ञानाच्या मागे धावतो आहोत, हे ज्ञान युग आहे. शोध लागतात, मानवी जीवन सुखी होण्याची अविरत धडपड आपण करतो आहोत. पण सुख म्हणजे समाधान नव्हे. समाज सुखी झाला तरी समाधानी होतोच असे नाही. म्हणूनच प्रभू रामचंद्रांनी वडिलांनी दिलेले वचन पाळून वनवासात प्रयाण केले. शाश्वत नीतीमूल्ये कशी जपायची त्याचा वस्तुपाठच दिला. ध्येयपूर्तीसाठी विचारपूर्वक सामर्थ्याची जमवाजमव कशी आवश्यकता आहे ते आपल्याला दाखवले. कठीण प्रसंगांना धीरोदत्तापणे कसे समोरे जायचे ते दर्शवले, प्रयत्नांती परमेश्वर हे सत्य पुन्हा एकदा समजावले असे अनेक बोधपर संदेश आपल्याला रामायणातून मिळतात. अशा रामायणाचे नित्य पठण, चिंतन व मनन आजच्या ताणतणावावर निश्चित मार्गदर्शक ठरते. छोट्या गोष्टी, अनेक रम्य चित्रे, त्या चित्रातून संदेश हे या चरित्र रामायणाचे वैशिष्ट्य ठरते. आजच्या चंगळ या दुष्टग्रहावर मात करायला रामायणासारखा दुसरा पर्याय नाही. मुलांनाच काय तरुणांना सुद्धा गोष्टी ऐकायला आवडतात आणि या गोष्टींतून साधलेला संवाद जास्त प्रभावी ठरतो. आजच्या संक्रमण काळात भाऊ एकमेकांचे वैरी होतात. त्यांना आदर्श बंधुप्रेमाचे पाठ राम, लक्ष्मण, भरत यांच्याकडून मिळतात. सीतेचे पतिव्रत्य आजच्या काळात आदर्श ठरते. हनुमानाची श्रीरामांवरची अगाध निष्ठा आपल्याला संदेश देते भक्तीचा. शक्ती, युक्ती आणि भक्ती यांचा सुंदर मिलाफ रामायणात आहे. चरित्र रामायणातल्या सगळ्याच गोष्टी बालमनावर निश्चित योग्य परिणाम घडवून आणण्यात यशस्वी ठरतात. माझ्या स्वतःच्या व परिचितांच्या नातवंडाना रामभरत भेट, जटायू-रावण युद्ध सेतू बांधा रे सागरी, कुंभकर्णाचा वध या गोष्टी फार भावल्या. सेतू बांधा रे सागरी ही कथा निष्ठेचा महिमा सांगते व मुलांना फार आवडते. खारीचा वाटा उचलायला मुलांना आनंद झाला आणि त्यांच्याकडून निष्ठेने अभ्यास झाला हे पाहून मला खात्री पटली की या रामायणाचा निश्चित योग्य परिणाम साधता येईल. फक्त आपली या मुलांपर्यंत पोचवायची तयारी हवी. वाचनसंस्कृती वर्धिष्णू होण्यासाठी, सद्विचारांची पेरणी करण्यासाठी रामायण हे प्रभावी माध्यम आहे.

संस्कार होतात ते मात्यापित्याकडून, आजी आजोबांकडून आणि शिक्षकांकडून. या सगळ्यांनी रामायणाचे वाचन, मनन, चिंतन करायला हवे तर खरे रामराज्य अस्तित्वात येईल. वाचनसंस्कृती समृद्ध करायची जबाबदारी शिक्षक व पालकच नाहीत तर शिक्षणाशी संलग्न असलेले अधिकारी व राज्यकर्ते यांचीही आहे. शाळाशाळातून घराघरातून हा रामायणाचा संदेश पोचवायला आपण कटिबद्ध होऊ मग भारत महासत्ता होण्याचे स्वप्न पुरे व्हायला वेळ नाही लागणार

डॉ. श्रीमती. स्नेहलता शामराव देशमुख
एम. एस. एफ. आर. सी. एस.
चेअरमन, किंग जॉर्ज इनफरमरी आणि
माजी कुलगुरु, मुंबई विद्यापीठ

अनुक्रमणिका

१)	वाल्याचा **वाल्मीकि** झाला	१
२)	मातृ-पितृ प्रेम : **श्रावणबाळ**	६
३)	मातृ-पितृ प्रेम : **श्रीराम**	११
४)	आदर्श बंधू : **लक्ष्मण**	१९
५)	आदर्श बंधू : **भरत**	२३
६)	आदर्श पत्नी : **सीता**	२८
७)	आदर्श पत्नी : **उर्मिला**	३७
८)	आदर्श दूत : **श्री हनुमान**	४०
९)	आदर्श दूत : **अंगद**	४६
१०)	सत्यनिष्ठेचा आदर्श : **बिभीषण**	५०
११)	श्रीराम गुणदर्शन : आदर्शाचा आदर्श : **श्रीराम**	५५
१२)	श्रीराम : **आदर्श शिष्य**	५७
१३)	श्रीराम : **आदर्श बंधू**	६०
१४)	श्रीराम : **आदर्श पती**	६३
१५)	श्रीराम : **आदर्श शरणदाता**	६६
१६)	श्रीराम : **आदर्श मित्र**	६८
१७)	श्रीराम : **आदर्श सेनानी-योद्धा**	७०
१८)	श्रीराम : **आदर्श राजा**	७२
१९)	**श्रीरामरक्षास्तोत्रम्**	७५

१. वाल्याचा **वाल्मीकि** झाला

गंगेच्या दक्षिण दिशेला पसरलेले ते घनदाट अरण्य होते. क्रूर श्वापदांनी भरलेले. तुरळक कोठे भिल्ल, शबर इ. वनवासी जमातीची वस्ती. दाट जंगलात शेती शक्यच नव्हती. रानातील कंदमुळे, फळे, मध, श्वापदे यांच्यावरच त्यांची उपजीविका. काही टगे रानातून जाणाऱ्या प्रवाशांना लुटून धन कमावीत. अशाच वातावरणात एका भिल्लाच्या घरात वाल्याचा जन्म झाला. शिक्षणाचे संस्कार अजिबात नाहीत. अंगात कुठली कला किंवा कसब नाही. त्यामुळे नीट आणि निश्चित उपजीविकेचे साधन नाही. मात्र स्वभाव बेदरकार, अंगात भरपूर शक्ती आणि रग. स्वाभाविकच अशी माणसे जो उद्योग करतात तोच म्हणजे चोऱ्या, मारामाऱ्या, वाटमारी, खूनखराबा हाच त्याचा धंदा होता. माणसांना लुटून ठार मारण्यात तो चांगलाच निर्ढावलेला होता. सहज चाळा म्हणून मारलेल्या माणसागणिक एक खडा तो रांजणात टाकी. असे अनेक रांजण त्याच्या अंगणात होते. त्याच्या कमाईवर त्याची बायको मुले चैन करत.

एक दिवस त्याच्या वाटेवर नारदमुनी आले. सरावाप्रमाणे वाल्याने त्यांना हटकले. नारद म्हणाले, 'अरे, माझ्याजवळ या चिपळ्या आणि वीणेशिवाय दुसरे काहीच नाही.' हळूहळू युक्ती प्रयुक्तीने त्यांनी त्याला बोलण्यात गुंतवले. बोलण्याच्या भरात त्यांनी त्याला विचारले,

'तू इतक्या माणसांना लुटलेस, ठार केलेस. अगदी न मोजता येण्या इतक्यांना तू मारलेस. असे तू का केलेस? हे इतके पाप आपल्या शिरावर घेतलेस ते का म्हणून?'

वाल्यासमोर उभे राहून इतक्या धीटपणे त्याला प्रश्न विचारणारा त्याने पाहिलाच नव्हता. त्यांच्या नीडरपणाचा त्याच्यावर परिणाम झाल्याशिवाय राहिला नाही. त्याच्यातला करडेपणा कमी झाला. आवाज पण जरा सौम्य झाला. नारदांची वाणी आणि व्यक्तिमत्त्व इतके प्रसन्न आणि परिणामकारक होते की त्याला सुद्धा त्यांच्याशी बोलावेसे वाटू लागले, तो म्हणालाः

'हॅ! त्यात कसले पाप? हा तर माझा धंदा आहे. ह्याच्यावर माझे आणि माझ्या कुटुंबाचे पोट आहे. आता जर तुम्हाला त्यात पाप वाटत असेल तर त्याला मी काय करु? त्या पापात मी ज्यांना पोसतो ती माझी बायका मुले वाटेकरी आहेतच.'

'अरे, शेवटी पाप ते पाप. पोटासाठी करा की चैनीसाठी, पापच. त्यातून सुटका नाही. हे पाप, ज्या बायका पोरांसाठी तू आपल्या डोक्यावर घेतले आहेस ते या पापाचा वाटा घ्यायला तयार आहेत का?'

'नक्कीच घेतील. का नाही घेणार? अखेर मी हे सारे त्यांच्या सुखांसाठी करत आलो आहे. त्याची त्यांना जाणीव असल्याशिवाय राहणार नाही.'

'खुळा आहेस तू. वेड्या सुखात आणि पुण्यात, यशात आणि उन्नत्तीमध्ये वाटा सांगणारे खूप उभे राहतात, पण दुःखात आणि पराभवात जसा कोणी साथी नसतो, तसाच पापात कोणी वाटेकरी नसतो. जा, मी तुझी वाट पाहत इथेच थांबतो. विचारुन ये बायका पोरांना. पापाचा वाटा घेता का म्हणून?

वाल्या हादरला. हा शेंडीवाला म्हणतोय ते थोडे थोडे त्याला पटायला लागले होते. पण त्याचा बायका मुलांवर पण भरवसा होता. तो तडक घरी आला. सर्वांना भोवती गोळा केले. सारी हकीकत सांगितली आणि पापातला वाटा घ्यायला कोण तयार आहे म्हणून विचारू लागला. त्याला जबरदस्त धक्का बसला. त्याचा भ्रमनिरास झाला. सारे म्हणायला लागले. ''आम्हांला पोसणे तुमचे कर्तव्य आहे. तुम्ही पापाचा पैसा आणता की पुण्याचा याचा आमच्याशी काय संबंध?'' सर्वांनी हात झटकलेले पाहून वाल्या पूर्ण खचून गेला. आता काय करायचे ते त्या शेंडीवाल्यालाच विचारावे म्हणून तो परत नारदमुनींच्या जवळ आला.

‘नारायण, नारायण! आलास विचारून? कितीजण घेतायत पापात वाटा?’ ‘महाराज, आपण ज्ञानी आहात. आपण सांगितले ते खरे आहे. साऱ्यांनी मला एकटे पाडले महाराज, आता यातून मार्ग काय? यातून मी कसा सुटेन? या बायका-पोरांचा मला वीट आला आहे. पुन्हा त्यांचे तोंड सुद्धा मला पाहायचे नाही.’ वाल्याला पश्चात्ताप झालेला पाहून आणि त्याला आता खरोखरच या पापातून सुटका करून घ्यायची तळमळ लागली असल्याची खात्री पटून नारदांनी त्याला नीट उपदेश केला. एका आंब्याच्या झाडाखाली त्याला आसन तयार करायला लावले. गंगेवर स्नान करून यायला सांगितले. त्या आसनावर त्याला बसवून, ‘राम, राम, राम, राम’ असा सतत अखंड जप करण्यास सांगितले.

‘वाल्या, मी परत येईपर्यंत हा जप असाच करीत बैस. तुझे पाप नष्ट होईल. मी परत आल्यानंतर पुढचे सांगेन.’

अनेक वर्षे उलटली. ही घटना नारदांच्या स्मरणातून निघून गेली. एकदा अचानक ते त्याच वाटेने जात असताना त्यांना धीर-गंभीर स्वरात ‘राम, राम’ असा अखंड जप ऐकू येऊ लागला. जवळपास कोणीच माणूस दिसेना. शोध घेताना त्यांच्या लक्षात आले की एका वारुळातून हा ध्वनी येत आहे. त्यांनी हाताने वारूळ दूर करून पाहिले तर एक अस्थिपंजर झालेला माणूस तेथे आसन-मांडी-घालून रामनामाचा जप करत बसला होता. त्यांना बारा वर्षापूर्वीचा तो प्रसंग आठवला. त्यांनी वाल्याला हाताने धरून उठवले.

‘ऊठ वाल्या! तू सर्व पापातून मुक्त झालास. या वारुळाची आठवण म्हणून जग तुला वाल्मीकि ऋषी म्हणून ओळखेल. तू आता येथेच आपला आश्रम स्थापन कर. स्वतः तपश्चर्या कर आणि लोकांना सुद्धा सन्मार्ग दाखव.’

नारदांच्या आदेशाचे पालन करीत वाल्मीकि ऋषी त्या वनात आश्रम स्थापून राहू लागले. एकदा त्यांच्या भेटीस नारद आले असताना त्यांनी विचारले:

‘देवर्षी, आजच्या युगात जीवनामध्ये सर्वार्थाने आदर्श ठरेल असा कोण पुरुष आहे का?’

नारदांनी त्यांना श्रीराम म्हणून अयोध्येत राज्य करणाऱ्या राजाचे जीवन चरित्र सांगितले. तसेच सध्याच्या काळी सर्वत्र सुख समृद्धी, शांती आणि आरोग्य वसत असल्याचे कारण त्या महान विभूतीच्या पुण्यप्रद राज्याचाच परिणाम असल्याचे सांगितले. राम कथा वाल्मींकिच्या मनात घर करून बसली. ते सतत त्याचाच विचार करू लागले. एकदा शिष्यांसह तमसा नदीवर स्नानासाठी जाताना, तेथे विहार करणाऱ्या क्रौंच पक्ष्याच्या जोड्यांतील नराला पारध्याने बाणाने मारल्याचे व मादी आक्रोश करीत असल्याचे दृष्य त्यांनी पाहिले. दुःख आणि

संताप यामुळे त्यांच्या तोंडून शापवाणी बाहेर पडली. अनवधनाने शापवाणी छंदोबद्ध होऊन बाहेर पडली. पण लगेच आपण शाप दिल्याचे त्यांना वाईट वाटू लागले. तेवढ्यात त्यांच्या समोर स्वतः ब्रह्मदेव प्रगट झाले.

'हे महर्षी, आत्ता आपण जो छंद उच्चारला, तो अनुष्टुभ छंद म्हणून प्रसिद्ध होईल. नारदाने सांगितलेली राम कथा याच छंदात सर्गबद्ध करून तिचा सर्व जनात प्रसार करावा.'

ब्रह्मदेवाच्या आदेशाप्रमाणे त्यांनी 'श्रीमद् रामायण' हे आद्य महाकाव्य रचले. एका अत्यंत महान राजाचा तशाच महान तपस्वी विभूतीने रचलेला हा काव्यमय इतिहास अतिशय उदात्त आहे, महान आहे. स्वतः ब्रह्मदेवांनी ते महाकाव्य ऐकून त्याला आशीर्वाद दिला आहे.

'जो पर्यंत सृष्टीमध्ये सूर्य चंद्राचे भ्रमण होत राहील, जो पर्यंत पृथ्वीवर पर्वत उभे असतील, नद्या वाहत असतील, सागर उचंबळत असतील, तो पर्यंत जगात श्रीराम कथा प्रचलित राहील.'

कथासार

संस्कारहीन माणूस कोणतेही पाप कर्म करण्यास कचरत नाही. पण त्याला योग्य व्यक्तीकडून योग्य मार्गदर्शन मिळाले, स्वतःची चूक उमगली आणि अपकृत्यांचा मनापासून पश्चाताप झाला, तर माणूस सन्मार्गाला लागू शकतो. दृढ निश्चय, पराकोटीचे श्रम आणि चिकाटी यांच्या योगाने महान पदाला पोहोचू शकतो. त्याच्या हातून महान आणि उदात्त कार्य होऊ शकते याचे महर्षी वाल्मीकिंचे जीवन हे आदर्श उदाहरण आहे.

रामायण उदात्त आहे कारण त्याचा नायक उदात्त आहे. परिवर्तनाचा आदर्श आहे. श्रीमद् रामायणामध्ये जे गुण प्रकट केलेले आहेत ते हजारो वर्षे उलटली तरी मानवी जीवनाचे आदर्श आहेत. शास्त्रीय प्रगती, तांत्रिक प्रगती कितीही होवो, मनुष्य हा अखेर मनुष्य आहे. त्याचे भाव, भावना, राग, लोभ, आनंद-दुःख, आशा-आकांक्षा, वासना, वृत्ती-प्रवृत्ती साऱ्या जशा तेव्हा होत्या तशाच आज सुद्धा आहेत. तितक्याच तीव्र, तितक्याच उत्कट. म्हणूनच मानवाच्या सृजनाचा विचार करणाऱ्याला रामायणाचा विचार करावाच लागतो. भारतीय मन त्यापासून दूर जाऊ शकत नाही.

म्हणूनच, जर जीवनात निरनिराळ्या मानवी संबंधामध्ये उदा. पिता, पुत्र, भाऊ, मित्र, शिष्य, गुरु, राजकारणी, समाजकारणी, योद्धा, न्यायदाता, कोणीही म्हणून यशस्वी व्हायचे असेल तर 'श्रीमद्रामायणाचा' व त्यात प्रगट झालेल्या गुणांचा परिचय प्रत्येक मानवाला अनिवार्य आहे.

२. मातृ-पितृ प्रेम : **श्रावणबाळ**



सायंकाळ होऊन अंधार दाटायला सुरूवात झाली होती पण ते वृद्ध जोडपे अजून स्वतःशीच गुंग होऊन बसले होते. दुपारी भोजनासाठी आलेले अतिथी घटके पूर्वीच आशीर्वाद देत निघून गेले होते. घरातली परिस्थिती अगदीच विपन्न नसली तरी फार नावाजण्याइतकी सुद्धा नव्हती. थोडी फार शेती आणि दारच्या गाईचा गोरस तिघांचे पोट भरण्यास पुरेशी होती. दारात आलेला पाहुणा, याचक, यात्री किंवा विद्यार्थी सुद्धा संतुष्ट होऊन जात असे. दोघेही वृद्ध, विकलांग आणि अंध होते. त्यांचे सारे त्यांचा एकुलता एक मुलगा श्रावणच करीत असे. नुकतेच जेवून गेलेले पाहुणे उत्तम कथाकार असावेत. त्यांनी पुष्कळ भ्रमण केलेले होते. निरनिराळ्या क्षेत्रांचे आणि तीर्थ स्थळांचे त्यांनी असे सुंदर वर्णन केले होते की नजरेसमोर प्रत्यक्ष दृष्य उभे राही. कोणालाही वाटावे आत्ताच जाऊन तो अनुभव स्वतः घ्यावा. झपाट्याने प्रवास केल्यास सहा महिन्यात त्रिस्थळी यात्रा सहज शक्य आहे असे ते अतिथी सांगत होते.

देवासमोर सांजवात लावून तुळशी पुढे दिवा ठेवण्यासाठी श्रावण अंगणात आला. रोजच्या प्रमाणे त्याने मात-पित्यांना वंदन केले पण दोघेही स्वतःतच हरवून गेले होते. शेवटी हाका मारून त्यांना भानावर आणले.

'आई, अग आई, अहो बाबा, तुमचे लक्ष कोठे आहे? रोजच्या सारखा मला आशीर्वाद दिला नाही. नाही तर केवळ माझ्या पावलांच्या आवाजाने तुम्ही मला ओळखता. आज लक्ष कुठे आहे?'

'श्रावणा, अरे दुपारी अतिथी निरनिराळ्या क्षेत्रांचे आणि तीर्थांचे काय सुंदर वर्णन करीत होता. असे वाटत आहे, आपण सुद्धा तीर्थयात्रा करावी. क्षेत्रांचे दर्शन घ्यावे. हे जीवन कृतार्थ व्हावे.'

'खरे आहे, पण आपण दोघे असे विकलांग, आंधळे, आपल्याला कसा शक्य आहे एवढा प्रवास? त्यातून रानावनातून, डोंगरदऱ्यातून वाट तुडवत जायचे. कसे शक्य आहे? आपण आपले नुसते कल्पनेनेच सारे बघायचे. या जन्मी तरी ते शक्य दिसत नाही. हीच इच्छा मनात ठेवून मरण स्वीकारू. कदाचित पुढच्या जन्मी तरी ती पूर्ण होईल.'

आपल्या आईवडिलांची तीर्थयात्रेची ती तीव्र इच्छा पाहून श्रावणाला भडभडून आले. त्याचा गळा दाटून आला. डोळे पाण्याने डबडबले. आईच्या गळ्याला मिठी मारून तो भरल्या गळ्याने म्हणाला- 'आई, अशी तिन्ही सांजेला कसल्या मरणारच्या गोष्टी करतेस? कशाला पुढच्या जन्माच्या गोष्टी करतेस? मी आहे ना! मी तुला तीर्थ यात्रा घडवतो. रोजच्या व्यायामाने आणि घरच्या कपिलेल्या दुधाने पुष्ट झालेले हे शरीर काय नुसते चैन करण्यासाठी आहे की काय? त्याचा उपयोग कधी होणार?

'श्रावणा, असे सोपे नाही तीर्थ यात्रा करणे. त्याला पैसे तर लागतातच पण प्रवास पण फार करावा लागतो. रानावनातून डोंगर दऱ्यातून आम्ही कसे चालणार? चार पावले चालले तरी मला धाप लागते. तुझ्या आईचे गुडघे धरतात. कसे शक्य आहे? जाऊ दे! उगीचच म्हटले आम्ही तसे. नको मनाला लावून घेऊस. नाही तरी आम्ही आंधळेच. डोळ्याने पाहू शकणार थोडेच? त्या यात्रेकरूंनी केलेले वर्णन आठवायचे आणि समाधान मानायचे. असू दे. नको मनाला लावून घेऊस.'

'असे कसे बाबा? तुम्हाला इच्छा झाली आणि मी ती पूर्ण नाही केली तर तुमचा पुत्र म्हणवून घेण्याचा मला काय अधिकार आहे? व्यर्थ आहे माझे जीवन. मीच तुमचे हात, पाय, मीच तुमचे डोळे. मजबूत कावडीत बसवून तुम्हाला माझ्या खांद्यावरून घेऊन जाईन. प्रत्येक

ठिकाणाचे असे सगळे वर्णन तुम्हाला सांगीन की जणू तुम्ही स्वतःच पाहत आहात. देवाच्या दयेने नगर शेठजींकडे आपले धन सुद्धा ठेव म्हणून ठेवले आहेच. घेऊ त्यातले थोडेसे.

'नको, अजिबात नाही. ते धन तुझ्या लग्नासाठी आणि तुला होणाऱ्या आमच्या नातवंडांसाठी ठेवले आहे. आमच्या म्हाताऱ्यांच्या चैनीवर उधळण्यासाठी ते पैसे नाहीत. त्यात ही त्रिस्थळी यात्रा म्हटले तरी महिनोन् महिने जाणार. येत्या वैशाखात तुझे लग्न काढलेले आहे. काही नको जायला. बाळा तू एवढ्या मोठ्या मनाने म्हणालास त्यातच आमची तीर्थ यात्रा झाली. अरे, नातवंडांच्या गराड्यातच आमचे चारी धाम. ते मात्र लवकर घडव बाबा.'

आई हसून बोलली आणि श्रावणाला जवळ ओढून त्याच्या डोक्यावरून हात फिरवू लागली. पण श्रावणाला काही ते पटले नाही. त्याने आई वडिलांची इच्छा पूर्ण केली नाही असे आजपर्यंत घडले नव्हते. मुळात ते दोघे कधी कुठली इच्छाच व्यक्त करीत नसत. कारण, त्यांचे सारे करण्यात श्रावणाची केवढी धावपळ होते हे ते पूर्ण जाणून होते. आईपासून दूर होत श्रावण म्हणाला, 'असू दे, ही काही उधळपट्टी नाही. असे कितीसे द्रव्य लागणार आहे प्रवासाला? राहिला प्रश्न वेळेचा. नुकताच अश्विन लागला आहे. पाऊस संपलाच आहे. लगेचच्या सुमुहूर्तावर निघालो तरी चैत्र संपता संपता आपण परत येतो. तुझी ती सुद्धा हौस वेळेत पूर्ण होईल. तू अजिबात काळजी करू नकोस.'

आई-वडील नको नको म्हणत असताना सुद्धा श्रावण उत्साहाने तयारीला लागला. गावातल्या बुरूडाकडून स्वतः समोर बसून चांगली ऐसपैस आणि मजबूत कावड बनवून घेतली. त्यात सावरीचा कापूस गोळा करून छानशी आसने घातली. चालताना कंटाळा वाटू नये म्हणून दोन्ही पारड्यांना मंजुळ वाजणारे घुंगरू लावले. शुद्ध त्रयोदशीच्या दिवशी सूर्योदयाच्या पूर्वीच ग्रामदेवतेला श्रीफळ ठेवून आणि देवळाला उजवी घालून आई-वडिलांची कावड खांद्याला घेऊन श्रावण यात्रेला निघाला. जवळ जवळ सारेच गावकरी गावच्या शीवेपर्यंत त्यांना निरोप देण्यासाठी आले होते. सारे वारंवार श्रावणाच्या मातृ-पितृ प्रेमाचे कौतुक करत होते. खरोखर असा पुत्र आपल्याला सुद्धा असावा असेच प्रत्येकाला वाटून गेले.

कष्टाची जरासुद्धा पर्वा न करता श्रावण माता पित्यांना कावडीत बसवून एका तीर्थावरून दुसऱ्या क्षेत्राला जात होता. त्यांना कुठलाही त्रास होणार नाही याची पूर्ण काळजी घेत होता. हां हां म्हणता दिवस जात होते. आता ठरवलेली जवळपास सारीच क्षेत्रे पाहून झाली होती. परतीचा प्रवास सुरू झाला होता. वसंत ऋतू पूर्ण भरात होता. जिकडे तिकडे वसंत शोभा पसरली होती पण चैत्रातले ऊन प्रताप दाखवतच होते. तरी बरे. वाट गर्द रानातून जात होती. सायंकाळच्या सुमारास सोयीची, स्वच्छ व सरोवराजवळची अशी जागा बघून श्रावणाने कावड

खाली ठेवली. गवताच्या शय्या तयार करून त्याने आईवडिलांना त्यावर बसवले. झटपट अग्नी सिद्ध करून त्याने जेवणे उरकली. तिघेही आडवे झाले. दिवसभराच्या श्रमाने श्रावणाचा चटकन डोळा लागला. बरीच रात्र उलटून गेली असावी. वडिलांच्या हाकेने श्रावणाला जाग आली. त्यांना पिण्यासाठी पाणी हवे होते. श्रावणाची झोप मोडू नये म्हणून ते स्वतः उठून कळशी घेण्यास गेले. पण अंदाज चुकून त्यांच्या धक्क्याने सारीच कळशी उपडी झाली. शेवटी श्रावणाला उठवावेच लागले.

'राहू द्या हो. बिचारा आता कुठे जरा आडवा झाला आहे. झोपू दे त्याला! थोडी कळ काढा. थोड्याच वेळात पहाट होईल. मग आणेल तो पाणी. झोप रे बाळा. असू दे, नको जाऊस.'

'बरे, बरे असू दे. असू दे. काढू कसा तरी दम पहाटे पर्यंत. येवढे काही त्यात मोठे नाही.

पण वडिलांनी रात्रभर तहानेने तळमळत रहायचे हे श्रावणाला पटणारे नव्हते. तो तसाच उठला. शेकोटी मधील एक जळते लाकूड मशाली सारखे घेऊन त्याने गडगडत गेलेली घागर शोधली व लगेच थोड्याच अंतरावरच्या सरोवरावर पाणी आणण्यासाठी गेला. बुडबुड आवाज करीत तो घागर भरून घेत होता आणि....

अयोध्येचा राजा दशरथ दिवसभर शिकारीसाठी रानोमाळ भटकत होता. त्याच्या सेनेची आणि त्याची ताटातूट झाली होती. त्याच सरोवराच्या काठावर एका उंच झाडावर बसून धनुष्याला बाण लावून तो श्वापदाची वाट पाहात होता. त्याला अनुभवाने ठाऊक झाले होते की दिवसभराच्या उन्हाने तहानलेली श्वापदे रात्री सरोवरावर पाण्यासाठी येणारच. त्याचा अंदाज खरा ठरला. सरोवराच्या दूरच्या टोकावरून हत्तीने सोंडेत पाणी घ्यावे तसा बुड बुड असा अस्पष्ट आवाज त्याच्या कानांनी टिपला. केवळ आवाजाने लक्ष्यभेद करण्यात दशरथ महाराजांचा हात धरणारा कोणी नव्हता. डोळ्याचे पाते लवते न लवते तोच त्यांच्या धनुष्यातून शब्दवेधी बाण सुटला.

'अरे देवा, आई ऽ ग, मेलो ऽ मेलो.' आर्त किंकाळी ऐकून महाराज दशरथ चरकले. पुढचा मागचा विचार न करता तेवढ्या उंचावरून त्यांनी खाली उडी टाकली आणि पायाखालचे काटे कुटे खाच खळगे तुडवत झाडाच्या फांद्या वेली चुकवत आवाजाच्या दिशेने धावत सुटले. धूसर चांदण्यात समोरचे दृष्य पाहून त्यांची मतीच गुंग झाली. त्यांनी सोडलेला शब्दवेधी बाण काळजात घुसून एक ब्राह्मण कुमार सरोवराच्या काठावर पडला होता. तशाही अवस्थेत त्याच्या हातातली कळशी सुटली नव्हती की लवंडली नव्हती.

झटकन पुढे होऊन त्यांनी बाण उपसून काढला. तोंडावर पाणी शिंपडून त्या ब्राह्मण कुमाराला त्यांनी शुद्धीवर आणले. क्षीण डोळे उघडून त्या कुमाराने पाहिले. तशा अवस्थेत सुद्धा त्याने आपल्या राजाला ओळखले. लटपटत्या हाताने कशीबशी कळशी उचलण्याचा प्रयत्न करीत तो म्हणला.

'महाराज, मी अत्रिकुलोत्पन्न श्रावण. थोड्याच अंतरावर वट-वृक्षाखाली माझे आई-वडील थांबले आहेत. दोघेही वृद्ध आणि अंध आहेत. तहानेने व्याकुळ आहेत. माझ्यावर उपकार करा. त्यांची तहान भागवा. ती दोघे असहाय्य आहेत. माझ्याशिवाय त्यांचे कोणी नाही. माझा तर आता भरवसा नाही. आता तुम्हीच त्याचे पालक. त्यांचे श्रावण. आई ऽ आई ऽऽ आई ऽऽ ग.'

दशरथ महाराजांच्या कुशीतच श्रावणाने प्राण सोडले. आयुष्यात प्रथमच आपल्या अजोड कौशल्याची महाराज दशरथांना लाज वाटली. त्यांच्या शब्दवेधी बाणाने आई वडिलांची इच्छा पूर्ण करण्यासाठी जिवाचे रान करणारे एक उमलते जीवन नष्ट झाले होते.

३. मातृ-पितृ प्रेम : **श्रीराम**

अजून पूर्व दिशा काळोखीच होती. पहाट तारा आकाशात चमकत होता. मंद मंद थंडगार वारा फुलांचा सुगंध घेऊन यज्ञ शाळेत शिरत होता. होमाच्या धुरात फुलांचा गंध मिसळून वेगळेच पवित्र वातावरण तयार झाले होते. पहाटे स्नान करून श्रीराम यज्ञ कुंडाजवळ बसले होते. वसिष्ठांसह सर्व आचार्य उच्चरवाने वेदघोष करीत होते. त्यांनी 'स्वाहाऽऽ' म्हणताच श्रीराम अग्नीत आहुती टाकीत होते. मोठे मंगलमय आणि प्रसन्न वातावरण होते. यज्ञशाळेतील सर्वांच्या चेहऱ्यावर आनंद आणि उत्साह नाचत होता. आचार्य असोत वा सामान्य दासदासी सारे उत्साहाने फुलून गेले होते. का नसतील? त्याला कारणही तसेच होते. सर्व मंत्रीगण, आचार्यगण आणि नागरिकगण यांच्या संमतीने महाराज दशरथांनी श्रीरामांना यौवराज्याभिषेक करण्याचे ठरविले होते.

आणि आजच तो करायचा होता. त्याच विधीचा भाग म्हणून हे हवन सुरू होते. सारी राज चिन्हे लेवून श्रीराम यज्ञवेदीसमोर बसले होते. श्रद्धेने आणि साक्षेपाने आहुती अर्पण करीत होते.

धापा टाकीत एक दास यज्ञशाळेत घुसला. कसाबसा नमस्कार करीत आणि दम सावरत तो म्हणला,

'श्रीरामांचा विजय असो. कैकेयी महाराणींच्या महालात महाराजांनी युवराजांना या क्षणीच पाचारण करण्याची मला आज्ञा केली आहे. महाराज आपली वाट पहात आहेत.'

श्रीरामांना नवल वाटले. वास्तविक महाराजांनी या वेळी श्रीरामांच्या मागे यज्ञशाळेत बसलेले असायला हवे होते. सारे त्यांचीच वाट पहात होते. मुहूर्त टळू नये म्हणून वसिष्ठांनी इतर आचार्यांच्या सल्ल्याने प्राथमिक आहुतीस सुरुवात केली होती. दासाचा निरोप ऐकून सारेच चकित झाले. 'काय? तातांनी मला आत्ता, ह्या वेळी कैकेयी मातेच्या महालात बोलावले आहे? सेवका, तू नीट ऐकलेस ना? की रात्रभराच्या जागराणाने तुला भलतेच काही ऐकू आले?'

'नाही युवराज. ह्यात एका शब्दाची सुद्धा चूक नाही. रात्रभर महाराज महाराणींच्या महालातच आहेत. स्वतः महाराज मंचकावर पडून आहेत. अस्वस्थ असावेत असे वाटते. त्यांच्या वतीने महाराणीनेच आपल्याला असाल तसे येण्यास सांगितले आहे.'

काळजीने आणि प्रश्नार्थक मुद्रेने श्रीरामांनी वसिष्ठांकडे पाहिले. 'श्रीरामा, तू जा. बघ काय प्रकार आहे. संकल्प झालेला आहेच, पुढील आहुत्या आम्ही पूर्ण करतो. एवढा होम आटोपून मी सुद्धा महाराणींच्या महालात येतो. काळजी करू नकोस. सारे क्षेम असेल.'

झपाट्याने दालनामागून दालने ओलांडत आणि झपाझप पायऱ्या चढत श्रीराम निघाले. महाल शृंगारण्याची सेवक सेविकांची लगबग चालू होती. अशा वेळी प्रत्यक्ष युवराजांना एवढ्या घाईने जाताना पाहून ते आश्चर्यचकित होत होते. कसेबसे वाटेवरून दूर सरत अभिवादन करीत होते. श्रीरामांचे कशाकडेच लक्ष नव्हते. महालाच्या दारात मंथरा उभी होती. जणू ती त्यांचीच वाट पाहत होती. तिला पाहताच त्यांच्या कपाळावर नकळत सूक्ष्म आठी उमटली. कैकेयी मातेशी तिची सलगी आणि तिचे एकूणच पाताळयंत्री वागणे त्यांना कधीच आवडत नसे. पण ती कैकेयी मातेची माहेरची विशेष आवडती दासी होती.

'ये रामा, ये! महाराज केव्हाचे तुझीच वाट पहात आहेत! केवढा वेळ घेतलास!!'

'मंथरे, काय एवढे तातडीचे काम आहे? मला धार्मिक विधीमधून उठवून तातडीने बोलावून घेतले? महाराज तर कुशल आहेत ना?' 'महाराजांना कुशल नसायला काय झाले? आणि धार्मिक विधी काय होत राहतील सावकाश, त्यासाठी एवढा जीव घाबरा करण्याची गरज नाही. तू प्रथम महालात चल. उगाच बोलण्यात वेळ वाया दवडू नकोस. आधीच उशीर झाला आहे.'

मंथरेचे ते डोळे आणि माना उडवत बोलणे तिच्या कुबड्या रूपाला मुळीच शोभत नव्हते. तिरस्काराची एक नजर तिच्यावर टाकत श्रीराम महाराणींच्या महालात शिरले.

आत पाऊल ठेवताच त्यांच्या काळजात चर्र झाले. संपूर्ण राजवाड्यात असलेल्या उत्साहाचा आणि सजावटीचा कैकेयी मातेच्या महालात मागमूस नव्हता. साऱ्या महालावर अवकळा पसरल्या सारखी दिसत होती. उशा, तक्के, गिरद्या महालभर अस्ताव्यस्त पसरलेले होते. फुलदाण्यामधील फुले कोणीकडे विखुरलेली, तर फुलदाण्या इथे तिथे पडलेल्या, जणू कोणी संतापने थैमान घालून बेभानपणे फेकाफेक केली असावी. पलंगावर महाराज दशरथ अस्ताव्यस्त पण पालथे पसरलेले होते. त्यांचे मस्तक आणि उजवा हात मंचकाबाहेर लोंबकळत होता. केस अस्ताव्यस्त झाले होते. वस्त्रांची त्यांना शुद्ध नव्हती. मिटलेल्या डोळ्यांतून सतत अश्रुधारा वाहत होत्या. मध्येच हुंदक्यांनी सारे शरीर गदगदत होते. त्यांच्या त्या अवस्थेकडे एक टक पाहत आणि छद्मीपणे हसत पलंगाच्या एका स्तंभाला धरून महाराणी कैकेयी उभी होती. पाठीवर फुले, गजरे नसलेले मोकळे सुटलेले केस, अंगावर साधे जुने वस्त्र, ना अलंकार, ना कुठला साज-शृंगार.

सारे एकाच नजरेत श्रीरामांनी टिपले. त्यांच्या काळजात चर्र झाले. मनात अशुभाची पाल चुकचुकली. क्षणात स्वतःला सावरून ते म्हणले.

'तात! आपला ज्येष्ठ पुत्र आपल्याला वंदन करीत आहे. माते, तुला सुद्धा माझा नमस्कार.'

उत्तरादाखल महाराजांनी एक जोराचा हुंदका दिला. डोळे उघडण्याची त्यांनी धडपड केली. पण अश्रूंनी जड झालेल्या पापण्या उघडल्याच नाहीत. आवाज ऐकून कैकेयीने आपली नजर श्रीरामांकडे वळवली. तिच्या चेहऱ्यावरचे भाव झटकन बदलले. खोटे खोटे हसत ती म्हणाली,

'ये रामा! केवढा वेळ लावलास. अरे आपल्या आई वडिलांना असे ताटकळत ठेवू नये, मग स्वतःचे कितीही महत्त्वाचे काम पुढ्यात असो.'

'माते, निरोप समजताच तडक आलो, तातांची प्रकृती बरी नाही का? ते असे का झोपले

आहेत? का रडत आहेत? महालाची अशी दुर्दशा का बरे? सारा राजवाडा आनंदात असताना तुझ्या महालावर ही शोककळा का म्हणून? तू अशी फुले, अलंकार रहित जीर्ण वस्त्रात काय म्हणून? सारे ठीक आहे ना? माते, लवकर सांग. माझा जीव घाबरा होत आहे.'

'अरे हो, हो, किती प्रश्न एकदम विचारशील. तसे सगळेच क्षेम आहे, फक्त तुझ्या तातांना तसे वाटत नाही. त्यांच्या प्रकृतीला सुद्धा काही झालेले नाही. आपल्या इक्ष्वाकू कुळाच्या प्रतिष्ठेशी रात्रभर झुंजण्याच्या श्रमाने ते थकले आहेत इतकेच.'

'म्हणजे? माते मला काहीच समजत नाही. जरा नीट समजेल असे सांग.'

'त्याचे काय आहे, पूर्वी महाराजांनी....' असे म्हणत मंथरा पुढे सरसावली, पण श्रीरामांनी एक जळजळीत कटाक्ष तिच्याकडे टाकताच ती घाबरून महालाच्या बाहेर पळाली.

'हा काय प्रकार आहे? ही कुब्जा काय म्हणत आहे? पूर्वी तातांनी काय केले? माते जरा लवकर सांग.'

ह्या वेळेपर्यंत वसिष्ठादी आचार्य व लक्ष्मण महालात दाखल झाले होते. पण एकूण वातावरण पाहून सारे हबकून गेले होते. कोणाच्याच तोंडातून शब्द फुटत नव्हता. श्रीरामांची त्यांच्याकडे पाठ असल्याने त्यांना त्यांच्या येण्याची चाहूल लागली नाही. मात्र कैकेयी त्यांच्यावरून नजर फिरवत व शेवटी श्रीरामांच्या नजरेत एक टक बघत अतिशय कोरड्या स्वरात म्हणाली-

'काही विशेष नाही. तुझ्या तातांबरोबर पूर्वी मी राक्षसांचा राजा वृषपर्वा याच्या विरूद्ध झालेल्या युद्धात त्यांच्याच रथात होते. युद्धात ऐन प्रसंगी मी त्यांचा रथ सावरून घेतला आणि ते जखमी असताना सुरक्षितपणे दूर नेला. नंतर त्यांनी माझ्यासह नव्या जोमाने राक्षसांवर हल्ला करून विजय मिळविला. त्यामुळे माझ्यावर प्रसन्न होऊन त्यांनी मला दोन वर मागून घेण्यास सांगितले. पण मी, 'योग्य वेळ येताच मागेन,' म्हणून सांगितले. आता ती वेळ आलेली आहे. मी ते दोन वर त्यांच्याकडे मागताच ते वर देण्याची टाळाटाळ करू लागले. शेवटी प्राण गेला तरी दिलेल्या वचनापासून न ढळण्याच्या तुमच्या इक्ष्वाकू कुळाच्या रीतीची त्यांना आठवण करून देताच त्यांनी स्वतःशीच रात्रभर झुंज दिली. आता थकून पडले आहेत. राम, आता वडिलांनी दिलेली वचने पूर्ण करणे हे तुझे कर्तव्य ठरते. शेवटी त्या वरांचा संबंध तुझ्याशीच पोहोचतो.'

'माते, तातांनी तुला अशी काय वचने दिली आहेत, ज्यामुळे ते इतके दुःखी झाले आहेत? मी प्राणांची बाजी लावेन. पण त्यांनी दिलेली वचने पूर्ण करीन. तू निश्चिंत रहा.'

‘रामा, माझा रुसवा दूर करण्याठी तुझ्या तातांनी मला वचन दिले. जगात त्यांना तुझ्या इतके प्रिय कोणीच नाही. तुझी शपथ घेऊन माझ्या सर्व इच्छा पूर्ण करण्याची प्रतिज्ञा त्यांनी घेतली. त्या प्रतिज्ञेवर विसंबून मी त्यांना पूर्वी दिलेल्या वराची आठवण देऊन पहिल्या वराने रामा, माझ्या भरतासाठी राजसिंहासन आणि दुसऱ्या वराने तुला चौदा वर्षे वनवास मागून घेतला. त्यांची परिस्थिती तू पहातोच आहेस. इक्ष्वाकू वंशाची शान राखणे आता सर्वस्वी तुझ्याच हातात आहे.’

हे ऐकताच इतका वेळ चिंतेने व काळजीने ग्रासलेला श्रीरामांचा चेहरा लगेच शांत झाला. प्रसन्न हास्य त्यांच्या चेहऱ्यावर पसरले. जणू सर्व ताण संपलेला होता. असहाय्यपणे पलंगावर पडून असलेल्या पित्याच्या जवळ जात ते म्हणाले,

‘तात, माझी कैकेयी माता माझे अहित कधीच चिंतणार नाही. असत्य भाषण तिच्याकडून शक्यच नाही. तरी केवळ उपचार म्हणून विचारतो, ‘तात हे सारे असेच घडले ना? तुम्ही अशी वचने कैकेयी मातेला दिलीत ना?’ महाराज दशरथांनी मोठ्या कष्टाने डोळे उघडून श्रीरामांकडे पाहिले. हात उचलण्याचा प्रयत्न केला. पण तेवढेही कष्ट त्यांचे कडून झाले नाहीत. हात कोसळून पडला. कसाबसा ‘रामऽऽ’ एवढाच एक आर्त स्वर त्यांच्या तोंडून बाहेर पडला आणि पुन्हा उमाळ्यावर उमाळा आणि हुंदके सुरू झाले. तिरखट स्वरात कैकेयी म्हणाली,

‘रामा, तुझ्या पित्याची अवस्था तुला दिसत नाही काय? काय तुझा माझ्यावर विश्वास नाही? तुझ्या पित्याप्रमाणे तुलासुद्धा त्यांनी दिलेली वचने पुरी करायची नसतील तर तसे सांग. निदान सत्यवादी वचननिष्ठ म्हणून मिरवणाऱ्या रघुवंशाच्या तथाकथित वाचावीरांचे खरे स्वरूप तरी जगाला समजू दे. माझी इच्छा पूर्ण करण्यास माझा भाऊ आणि प्रिय पुत्र समर्थ आहेत.’

‘माते रागवू नकोस. माझी तुझ्यावर संशय घेण्याची हिम्मत कशी होईल? तुझ्या इतक्या साध्या मागण्यांसाठी तू वृद्ध तातांना इतका त्रास विनाकारण दिलास. केवळ मला जरी सांगितले असतेस तरी तुझ्या आवडीचे तेच मी केले असते. सर्व देवदेवतांना, वडिलधाऱ्यांना आणि माझ्या सर्व पुण्य कर्मांना साक्षी ठेवून माते कैकेयी, वचनाप्रमाणे मी धाकटा भाऊ भरतासाठी माझा अयोध्येचा राजसिंहासनावरील हक्क सोडून देत आहे आणि दुसऱ्या वराप्रमाणे आज सूर्यास्त होण्यापूर्वीच मी अयोध्यापुरीचा त्याग करून वनवासासाठी निघेन. केवळ मला माझी माता कौसल्या आणि सीतेचा निरोप घेण्याची अनुमती दे.’

महाराज दशरथांनी पुन्हा 'राम ऽ ऽ अरे माझ्या बाळा, रामा ऽ ऽ....' असा हंबरडा फोडला. तिकडे दुर्लक्ष करीत कैकयी पुन्हा म्हणाली.

'रामा, वनवासात जायचे म्हणजे वनक्रीडा करणे नव्हे. ही सर्व वस्त्रे, अलंकार, दास, दासी, सैनिक, अंगरक्षकांचा डामडौल सोडून देऊन केवळ वल्कले नेसून तापस वेश घेऊन कोणत्याही नगरीपासून दूर, जनसंपर्कापासून अलिप्त, वनात राहावयाचे आहे.'

'मान्य माते, सर्व मान्य. जे तुला प्रिय आहे तेच मी करेन. तू निश्चिंत राहा.'

इतका वेळ अस्वस्थपणे सारा प्रकार पाहत असलेला लक्ष्मण कमरेची तलवार उपसून ताडकन् श्रीराम व कैकेयी यांच्यामध्ये उभा राहिला. कैकेयीकडे अत्यंत संतापलेल्या जळजळीत नजरेने पहात अगदी कठोर आवाजात श्रीरामांना म्हणाला,

'मी याचा धिक्कार करतो. ज्या कोणाची श्रीरामाला राजगादीवर बसण्यापासून रोखण्याची हिम्मत असेल त्याने या लक्ष्मणाच्या तलवारीशी प्रथम बोलावे. रामा, तू खुशाल सिंहासनावर बैस. मुहूर्त वाया जाऊ देऊ नकोस. अरे ज्या पित्याच्या नावाने ही पापिणी इतका वेळ बडबड करीत काय हवे ते बरळत आहे ते तात स्वतः तर एक शब्द बोलत नाहीत. सारे हिच्या मनाचे मांडे दिसत आहेत आणि आपल्या लाडक्या राणीचे लाड पुरवण्यासाठी राज्यावर निखारे ठेवायला निघालेल्या ह्या राजाला सुद्धा मी बंदिवासात टाकण्यास कचरणार नाही. रामा, तू पुढे हो. वसिष्ठ महाराज तुला अभिषेक करण्यास सिद्ध आहेत. कैकेय देशाच्या सैनिकांच्या आणि वेळ पडल्यास भरताच्या रक्ताने शरयू लाल झाली तरी हा लक्ष्मण तुला सिंहासनावर बसविल्याशिवाय राहणार नाही.'

लक्ष्मण अशाप्रकारे खूपच अद्वातद्वा बोलू लागला. बोलताना त्याने सर्व मर्यादा सोडल्या. नात्याचा, वडिलकीचा, कशाकशाचा त्याने विचार केला नाही. आपली आई, गुरू, मोठा भाऊ यांची तमा त्याने बाळगली नाही. महालातल्या दासदासी नोकरचाकरांचा संकोच त्याने बाळगला नाही. लाह्या फुटाव्यात तसा ताड् ताड् बोलत राहिला.

लक्ष्मणाचा एकंदर आवेश आणि बोलणे ऐकून कैकेयी पण दचकून चार पावले मागे सरकली आणि आधारासाठी महालाच्या भिंतीला टेकून उभी राहिली. लक्ष्मणाच्या डोळ्यात पहात, सौम्य हसत आणि अत्यंत शांत स्वरात श्रीराम म्हणाले,

'लक्ष्मणा, शांत हो, क्रोध आवर. कोणाविषयी असे अभद्र बोलत आहेस? प्रत्यक्ष जन्म दात्या पित्याबद्दल आणि देवतुल्य मातेबद्दल? अरे बाळा, सावत्र असली तरी ती आपली आईच नव्हे का? आणि भरत का कुणी परका आहे? आपलाच धाकटा भाऊच ना? मग

सिंहासनावर मी बसलो काय किंवा भरत बसला काय? एकच. आईवडील मुलांच्या हिताचे नसलेले काहीही करणे कधी तरी शक्य आहे? त्यांच्या मनात केवळ आपल्या कल्याणाचाच विचार असतो. कदाचित मातेचा त्यातून काही वेगळा उद्देश सुद्धा असू शकेल. आता राहिला प्रश्न प्रत्यक्ष तातांनी सांगण्याचा. मौन हे सुद्धा संमतीचे लक्षण आहे हे शास्त्रवचन तुला माहीत नाही काय? जर कैकेयी माता काही विपरीत सांगत असती तर तातांनी तिला रोखले नसते काय? शांत हो. मोठ्यांच्या शब्दाचा कुठलाही प्रतिवाद न करता मान राखणे हेच लहानांचे कर्तव्य आहे. मग आपल्याला पटत असो वा नसो, पण माता-पित्यांच्या आज्ञेचे पालन करणे, त्यांच्या इच्छा पूर्ण करणे, मुलांचे कर्तव्य आहे हे सारे तू कसा विसरतोस? ती तलवार दूर कर आणि कठोर शब्दांबद्दल माता-पित्यांची क्षमा माग.'

बऱ्याच प्रयत्नांनी लक्ष्मणाचा राग कसाबसा शांत झाला. श्रीरामांचा वनवासात जाण्याचा निर्धार पक्का असल्याचे पाहून त्याने सुद्धा त्यांच्या सोबत वनात जाण्याचा हट्ट धरला. अखेर कैकेयी मातेच्या आज्ञेप्रमाणे लक्ष्मण व सीतेसह श्रीराम रथात बसून वनवासात जाण्यास निघाले. मागे राहिले दुःखाने पिळवटून निघालेले महाराज दशरथ, माता कौसल्या, सुमित्रा आणि दुःखात बुडालेली अयोध्या!

कथासार

मुलांनो, आपण दोन पुत्र पाहिले. पहिला श्रावण व दुसरे श्रीराम. एक सामान्य माणूस. दुसरा एका साम्राज्याचा राजकुमार, ज्याला लवकर सारे राज्य मिळणार होते. दोघांचे आपल्या मातापित्यांवर किती प्रेम! किती श्रद्धा! त्यांच्या इच्छा पूर्ण करण्यासाठी त्यांना स्वतःच्या दुःखाची जरासुद्धा तमा वाटत नाही. आपल्या माता पित्यासाठी कोणतेही कष्ट, कोणताही त्याग करण्यास दोघेही तत्पर होते. हसतमुख, जरा सुद्धा कंटाळा न करता किंवा आपण काही विशेष करीत आहोत याचा आव न आणता.

आई वडिलांची तीर्थयात्रेची इच्छा पूर्ण करण्यासाठी श्रावणाने तन, मन, धन कशाचीच पर्वा केली नाही. दुर्दैवाने महाराज दशरथांच्या हातून त्याचा अपघाती मृत्यू झाला म्हणजेच त्याने माता पित्यांच्या सेवेसाठी तन, मन, धन आणि प्राणांचा सुद्धा त्याग केला. श्रीरामांनी कैकेयी मातेची इच्छा बरोबर की चूक याची चर्चा न करता एका क्षणात सारे राजवैभव, सुख आणि सत्ता गवताच्या काडीप्रमाणे झुगारून दिले. हसतमुखाने वनवासाचे सारे कष्ट, सारी संकटे सहन केली. कोणी कितीही युक्तिवाद केला, विनवण्या केल्या तरी आपल्या निश्चयापासून ढळले नाहीत.

जे श्रावणाने केले, श्रीरामांनी केले, आपल्या असंख्य पूर्वजांनी केले ते करणे आपल्याला अशक्य आहे का? काळ प्राचीन असो की आजचा, आई-वडील, आई-वडीलच असतात. मुले मुलेच असतात. त्यांनी सांगितलेले ऐकणे, त्यांची इच्छा न कुरकुरता, उलट प्रश्न न करता पूर्ण करणे अशक्य नाही.

पूर्वी सारे एकत्र राहात. आजी-आजोबा, आई-वडील, काका-काकू, भावंडे, चुलत भावंडे सगळी एकत्रच असत. आता फक्त आई-वडील, भाऊ-बहीण क्वचित कुठे आजी-आजोबा. कधी तर उच्च शिक्षणासाठी किंवा वेगळ्या प्रकारच्या शिक्षणासाठी आपण दूर राहण्यास अगदी परदेशी सुद्धा जाणार. मग आईबाबांच्या इच्छा कशा पूर्ण करणार, त्यांच्या आज्ञा कशा पाळणार?

श्रीराम आदर्शाचे महापर्वत आहेत. गुणांचे सागर आहेत. त्यांचा हा एक गुण तरी आपण अंगी सहज बाणवू शकू. बघा, सगळे तुमचे किती कौतुक करतील. तुमच्या आई-वडिलांना किती आनंद होईल आणि तुम्हांला स्वतःला किती समाधान वाटेल. मग करायचा निश्चय या क्षणापासून....

सोप्पं आहे. असं मुळी वागायचंच नाही ज्यामुळे त्यांच्या मनाला त्रास होईल. त्यांना चार चौघात शरमिंदे वाटेल. त्यांना आपल्या वागण्याची काळजी वाटेल. आई-वडिलांची मुख्य इच्छा काय तर आपल्या मुलांचे सर्वांनी कौतुक करावे, गुणगान गावे, त्याचा गौरव होत रहावा. तसे आपण वागण्याचा प्रयत्न करायचा, बस्स!

४. आदर्श बंधू : **लक्ष्मण**



लक्ष्मण श्रीरामांच्या महालात गेला तेव्हा श्रीराम दोन्ही हातात डोके गच्च धरून बसले होते. महालाच्या साऱ्या खिडक्या बंद असल्याने पुरेसा उजेड सुद्धा नव्हता. श्रीरामांचा चेहरा बघताच लक्ष्मणाच्या काळजाचा ठोका चुकला. हेच भाव, हीच वेदना, दुःख, मनःक्षोभ त्याने पंचवटीमध्ये बघितले होते. रावणाने जानकीला पळवून नेले तेव्हा.

लक्ष्मणाची चाहूल लागताच श्रीरामांनी त्याच्याकडे जखमी पक्षाच्या आर्त नजरेने पाहिले. अत्यंत कष्टाने त्यांच्या तोंडून शब्द फुटत होते.

'लक्ष्मणा, अरे या प्रजेचे काहीच समजत नाही. यांचे कशाने समाधान करावे कळेनासे होते. लंकेमधेच सीतेने अग्निदिव्य केले तेव्हा प्रत्यक्ष अग्निदेवांनी तिच्या शुद्धतेची आणि पवित्रतेची साक्ष साऱ्या वानर व राक्षस सेनेसमोर दिली होती. पण आजसुद्धा त्यावर विश्वास न ठेवणारे लोक नगरीत असावेत हे बघून मन पिळवटून निघते. बघ तो धोबी मला मूर्ख ठरवतो आहे, वर्षभर शत्रूच्या घरात राहिलेल्या बायकोचा स्वीकार केला म्हणून. लक्ष्मणा, सीतेच्या पावित्र्याची आणखी किती वेळा आणि कशी खात्री पटवून देऊ?'

'तो कोण धोबी आहे त्याचे नाव, ठिकाण समजले काय? मला सांग, आत्ताच्या आत्ता मी स्वतः जातो आणि त्याला बंदिवान करून आणतो आणि अशी शिक्षा करतो की त्याच्या सात पिढ्या लक्षात ठेवतील. जानकीसारख्या साध्वीचा संशय घेतल्याचे काय फळ असते ते प्रजेला सुद्धा एकदा कळूच दे....

'नको, असे काही आततायीपणे करू नकोस. शिक्षा म्हणजे चौकशी आली. म्हणजे या साऱ्या प्रकाराची जाहीर चर्चा. लक्ष्मणा, यामुळे जानकीला किती यातना सोसाव्या लागतील ते लक्षात घे. साध्वी स्त्रियांना कष्टाची मातब्बरी नसते, पण त्यांच्या शीलाचा संशय घेतला गेला तर त्यांना त्यापेक्षा मरण बरे अशा यातना होतात.'

'मग, काय जानकीने परत अग्निदिव्य करायचे की काय?'

'लक्ष्मणा, प्रजेचे हित याशिवाय मला दुसरे काही प्रिय नाही. प्रजेचे मन राखण्यासाठी, तिला संतोष देण्यासाठी मला आणि माझ्या आप्तांना कितीही कष्ट पडले तरी मला तमा नाही. माझा निश्चय झाला आहे. त्यात आता बदल शक्य नाही. तुला माझ्या प्राणांची शपथ आहे. तू फक्त आज्ञेचे पालन करशील. त्यावर चर्चा करणार नाहीस.'

'आज अशी शपथ का घालावीशी वाटली? आतापर्यंत माझ्या हातून मर्यादेचे उल्लंघन झाले आहे का? की माझ्यावर विश्वास राहिला नाही? रामा, जर तुझा माझ्यावर विश्वास राहिला नसेल तर स्वर्गात सुद्धा लक्ष्मणाला स्थान उरणार नाही!'

'लक्ष्मणा, असे बोलू नकोस. तू सतत माझ्या सोबत सावलीसारखा राहिलास. विश्वामित्रांच्या आश्रमात असो की वनवासात, तू साथ सोडली नाहीस, हे मी कसे विसरू? तुला लोक शरीराबाहेरचा माझा प्राण म्हणतात. अंधार पडल्यानंतर सावली लुप्त होते. पण तू सदैव माझ्यासोबत आहेस. माझ्या आयुष्यातील सर्वात कठीण आणि दुःखद प्रसंगात मला

तुझीच साथ होती. माझ्या भावना, अंतरंग जाणणारा तुझ्याइतका विश्वासू मला दुसरा कोणी दिसत नाही. जे कार्य मी तुला सांगणार आहे ते इतके दुःखदायक आहे, की इतके दुःख मी फक्त तुलाच देऊ शकतो. ते दुःख पचवणे आणि त्यामधून होणारा मनक्षोभ सहन करणे फक्त तुलाच शक्य आहे. पण सौमित्रा, मी स्वतः इतका क्षीण झालो आहे, हा निर्णय घेताना मला एवढा त्रास झाला आहे की तुझ्या कोणत्याही प्रश्नाचे समाधान करणे दूरच पण उत्तर देणे सुद्धा मला शक्य नाही. म्हणून माझ्या मनात नसताना सुद्धा तुला मी माझ्या प्राणांची शपथ घातली.'' 'म्हणजे आपण जानकी....'

'होय, दुर्दैवाने मला जानकीचा त्याग करावा लागत आहे. आमच्या नशिबात एकमेकांचा सहवास नाही. लक्ष्मणा, उद्या सकाळी माझा सुवर्णरथ घेऊन तू स्वतः जानकीला घेऊन नीघ आणि गंगेच्या पलिकडे महर्षी वाल्मीकींच्या आश्रमाजवळ सोडून परत ये. मी तिचा त्याग केल्याची बातमी सुद्धा तूच तिला द्यायची आहेस आणि सर्वात महत्त्वाचे, या क्षणापासून जानकीला माझ्या समोर आणायचे नाही. निरोप घेण्यासाठी म्हणून सुद्धा नाही. तिला सामोरे जाण्याचे धैर्य माझ्यात उरलेले नाही. तिचे दुःख, तिचा संताप, मनस्ताप, तूच सहन करायचा आहेस. माझ्यासाठी फक्त तूच हे सारे करू शकतोस.'

'रामा प्राणांची शपथ घालून माझे तोंड बंद केलेस. किती कठीण निर्णय घेतलास. तो सुद्धा एवढ्या तडकाफडकी. रामा जानकीशिवाय जीवन तुला शक्य आहे का? अरे, अजून राज्याला वारस नाही त्याचा तरी विचार केला असतास. हे सारे सहन करणे मला कसे शक्य होईल, कोणास ठाऊक?' 'लोकांचे मन राखण्यासाठी मला जानकीचा त्याग करावा लागला तरी तो मी करीन. ही तर माझी प्रतिज्ञा आहे. राज्याचे वारस आता महर्षी वाल्मीकींच्या आश्रमात जन्मतील आणि तेथेच वाढतील, जर नियतीची तशीच योजना असेल तर.'

श्रीरामांच्या आज्ञेप्रमाणे हे कटू कर्तव्य लक्ष्मणाने मनावर दगड ठेवून पार पाडले. श्रीराम अन्यत्र गेल्याचे खोटे सांगून त्याने त्यांची आणि सीतेची भेट होऊ दिली नाही. वाल्मीकी ऋषींच्या आश्रमाचा परिसर येईपर्यंत त्याने सीतेला कशाचीही जाणीव होऊ दिली नव्हती. अगदी शेवटच्या क्षणाला त्याने सत्यस्थिती सांगितली. सीतेचा सारा शोक, सारा संताप त्याने जळत्या हृदयाने ऐकून घेतला आणि जन निंदा ऐकून घेण्यासाठी डोळ्यातील अश्रू सुद्धा न पुसता वेगाने रथ हाकत अयोध्येस परत निघाला.

कथासार

लक्ष्मण म्हणजे श्रीरामांचा शरीराच्या बाहेर असलेला प्राण! त्याचे श्रीरामांवर एवढे जिवापाड प्रेम होते की तो स्वतःसाठी विचार करीतच नसे. श्रीरामांचा त्याच्यावर अतोनात विश्वास होता. म्हणूनच जे काम ते स्वतः सुद्धा करू शकत नव्हते ते सीता त्यागाचे काम त्यांनी त्याच्यावर सोपवले. हा निर्णय घेताना श्रीरामांना किती मानसिक त्रास सहन करावा लागला असेल, ते केवळ लक्ष्मणच जाणू शकत होता. कर्तव्यनिष्ठेमध्ये तो श्रीरामांइतकाच कठोर होता.

आज हजारो वर्षे लोटली, पण आदर्श भाऊ कसा असावा यासाठी लक्ष्मणाचेच नाव घेतात. हे भावा-भावांचे प्रेम एकतर्फी नव्हते. दोघेही एकमेकांवर तितकेच प्रेम करीत. आपण आपल्या भावांवर, बहिणीवर असे स्वार्थरहित प्रेम करू शकतो का? प्रयत्न करायला काहीच हरकत नाही.

५. आदर्श बंधू : **भरत**

कैकेयीचे वर ऐकताच दशरथ हतबद्ध झाला. त्याच्या शोकाला पारावार उरला नाही. कैकेयी वरासाठी हटून बसली तेव्हा त्यांनी तिची खूप निंदा केली. त्यांना खात्री होती. स्वतः भरतालासुद्धा कैकेयीचे हे वागणे आवडणार नाही. तो म्हणला-

'तुझा हा दुष्ट हेतू भरत कधीही पूर्ण होऊ देणार नाही. तो जर माझा पुत्र असेल तर त्याला रामाचे राज्य हिरावलेले कधीच आवडणार नाही. तो त्याच्या ऐवजी सिंहासनावर बसणार नाही. तुझे कुटिल कारस्थान तो उधळून लावेल. श्रीराम लक्ष्मण व सीतेसह वनात गेले. ते दुःख सहन न होऊन राजा दशरथ मरण पावला. कुलगुरू वसिष्ठांनी भरताला आजोळाहून बोलावून घेतले. आपली आई कैकेयी हिला भेटेपर्यंत त्याला यातील काहीच माहीत नव्हते. श्रीरामांना वनवासात पाठवून त्याच्या आईने त्याच्यासाठी राज्य मिळवले हे तिच्याच तोंडून ऐकताच त्याचा ज्वालामुखीप्रमाणे स्फोट झाला. त्याला संताप आवरेना. आपल्या जन्मदात्या

आईची त्याने अतिशय कठोर शब्दात निंदा केली. त्याने आपल्या पित्याचा विश्वास सार्थ ठरवला. राजसिंहासनावर बसण्यास त्याने तिला स्पष्ट नकार दिला.

दशरथाचे अंत्यविधी भरताकरवी पार पाडून वसिष्ठांनी मंत्रिमंडळ आणि प्रमुख प्रजाजनांची सभा घेतली. सभेतील सर्वांनी राजाशिवाय राज्य राहणे शक्य नाही, शत्रू त्याचा फायदा घेईल वगैरे सांगून भरतास राज्याभिषेकासाठी राजी करण्याचा प्रयत्न केला. त्यांना उत्तर देताना भरत म्हणाला, 'आपण सारे वडील आहात. वयाने सुद्धा आणि ज्ञान व अनुभवाने सुद्धा. राज्याचे हित आपण सतत पहात आलात. हे राज्य राजाशिवाय असणार नाही. मी उद्याच अयोध्येच्या खऱ्या राजाला वनातून शोधून आणण्यासाठी जाणार आहे. अयोध्येच्या गादीवर रामाशिवाय कोणीच बसणार नाही. सर्वांनी भरताची खूप प्रशंसा केली. विनासायास मिळालेले राज्य गवताच्या काडीसारखे तुच्छ लेखून ते आपल्या मोठ्या भावाला परत देण्याची त्याची तळमळ पाहून सर्वांना अतिशय आनंद झाला. दुसऱ्याच दिवशी सर्व माता, पूर्ण राज्यपरिवार, मंत्री, पुरोहित यांच्यासह चतुरंग दल घेऊन भरत निघाला निषादराज गुह आणि त्याचे सेवक यांच्या मदतीने त्यांने चित्रकूट पर्वत व त्यावरील श्रीराम आश्रम शोधून काढला.

सीतेसह बसलेले श्रीराम डोळ्यांनी दिसताच हरवलेले मूल आईकडे धावते तसा तो धावत सुटला आणि सरळ श्रीरामांच्या चरणी कोसळला.

अश्रूंनी त्याने श्रीरामांचे पाय धुवून काढले. मोठ्या प्रयासाने त्याला त्यांनी उठवले आणि छातीशी धरले. काही वेळाने आवेगाचा पहिला भर ओसरला. साऱ्यांच्या भेटी झाल्या. पण तात दिसेनात तेव्हा श्रीरामांनी चौकशी केली. त्यांचा मृत्यू झाल्याचे कळताच त्यांना खूप शोक झाला. तर्पणासह त्यांनी यथासांग श्राद्ध केले. चार दिवस सारे एकत्र राहिले. निघण्याची तयारी सुरू झाली. भरताने श्रीरामांना परत चलण्याची आणि अयोध्येच्या गादीवर बसण्याची विनंती केली.

'रामा, अयोध्येचे राज्य तुझेच आहे ते तूच सांभाळ, आम्ही सारे तुला परत नेण्यासाठी आलो आहोत.'

'तातांनी कैकेयी मातेला वचन दिले आहे. ते पूर्ण करणे आपल्या दोघांचेही कर्तव्य आहे. इक्ष्वाकू कुळाची कीर्ती वाढत राहील अशा उत्तम प्रकारे राज्य कर. मी अयोध्येला परत येणार नाही, असे समजू नकोस. चौदा वर्षांचा काळ संपताच मी परत येईन, तोपर्यंत नाही.

'तुला सोबत घेतल्याशिवाय मी परत जाणार नाही. जर तू वनात राहण्याचा निश्चय केला असशील तर लक्ष्मणाप्रमाणे मी पण तुझ्या सोबत राहीन. मी एकटा परत जाणारा नाही.'

'असा दुराग्रह करू नकोस बाळा. वडिलांचे वचन पूर्ण करणे ही आपल्या दोघांची जबाबदारी आहे. आपण मनुष्य आहोत, दैवाच्या हातची खेळणी. तातांचा मृत्यू किंवा माझे वनात येणे हे सारे आपल्याला अकल्पित असले तरी ते दैवी योजनेनेच घडले आहे, तू त्याचा शोक करू नकोस. राजाशिवाय राज्य म्हणजे धनगराशिवाय मेंढ्यांचा कळप. मोकळी सुटलेली गवताची पेंढी. समर्थ राजा असेल तरच समर्थ राज्य उभे राहते. तू आदर्श राजाप्रमाणे अयोध्येचे राज्य कर. तू राज्य करावेस व मी वनात रहावे अशी जर दैवी योजना असेल तर त्यात तुझा दोष काय?

अशा नाना प्रकारे समजावून सांगून सुद्धा भरत ऐकेना. शेवटी रामाने त्याला शपथ घातली तेव्हा त्याचा नाइलाज झाला.

'रामा, तू आज्ञा करतोस म्हणून मी परत जात आहे. मात्र लक्षात ठेव हे राज्य तुझेच आहे. चौदा वर्षानंतर परत आल्यावर तुलाच सांभाळायचे आहे. मी तुझा प्रतिनिधी म्हणून ते सांभाळीन. सिंहासनावर मी नाही, तुझ्या चरण पादुका असतील. मी सुद्धा तापस वेषच धारण करीन. कंदमुळे, फळे खाऊन व्रतस्थ राहीन. अयोध्येत प्रवेश करीन तर तुला सोबत घेऊनच. मात्र जर चौदा वर्षांचा काळ संपल्यानंतर तू एक दिवस जरी उशीर केलास तर मी अग्निप्रवेश करून माझ्या प्राणांची आहुती देईन. हे सारे तुला मान्य असेल तरच मला अनुज्ञा दे.'

दोन्ही भावांची निस्पृह प्रीती पाहून सारे रोमांचित झाले. श्रीरामांच्या चरण पादुका मस्तकी घेऊन भरत अयोध्येस परत आला. प्रत्यक्ष नगरीत प्रवेश न करता दोन कोस अलीकडे नंदीग्राम नावाच्या गावात तो वल्कले नेसून व्रतस्थ वृत्तीने राहून श्रीरामांच्या नावाने राज्य कारभार करू लागला. राजनगरात राहून तो पर्ण कुटीत राहात होता, सर्व सुख उपभोगांपासून अलिप्त.

एक एक क्षण युगाप्रमाणे भासणारा प्रतीक्षेचा काळ संपला. चौदा वर्षे पूर्ण झाली, पण अजून श्रीरामांची काहीच बातमी कळली नाही. ना ते स्वतः आले, ना त्यांनी काही संदेश पाठवला. सूर्यास्त झाला. भरत निराश झाला. आत ही शेवटची रात्र. उद्या सूर्योदयापर्यंत श्रीरामाचे दर्शन न घडल्यास प्रतिज्ञेप्रमाणे अग्निप्रवेश करण्याचा त्याने निश्चय केला. त्याने लाकडांची चिता रचण्याचा आदेश दिला. एवढ्यात सेवकाने त्यांच्या दर्शनाची अपेक्षा एक वृद्ध करीत असल्याचा निरोप दिला. अतिशय जरा- जर्जर असा तो वृद्ध समोर आला. त्याने भरताचे क्षेमकुशल विचारले. 'श्रीरामांच्या कृपेने आतापर्यंत सारे कुशलच होते. माझ्या

कुवतीप्रमाणे मी त्यांचे राज्य चौदा वर्षे सांभाळले. आज चौदा वर्षाचा काळ पूर्ण झाला. दिलेल्या वचनाप्रमाणे अजून श्रीराम परत आलेले नाहीत. चंद्र सूर्याचे उदयास्त जेवढे निश्चित तेवढेच श्रीरामांचे वचन शाश्वत हा माझा विश्वास वाया जाणार की काय असे वाटते आहे. उद्या सूर्योदयापर्यंत श्रीरामांची वार्ता न समजली तर अग्निप्रवेशासाठी चिता तयार आहे.'

भरताचा तो आर्त भाव, ती कळकळ पाहून त्या वृद्धाचे डोळे झरू लागले. दुसऱ्याच क्षणी त्या वृद्धाने आपले रूप टाकून दिले. एक भव्य वानर भरतासमोर उभा होता. तो हनुमान होता.

स्वतःचा परिचय देऊन हनुमानाने श्रीरामांच्या आगमनाची वर्दी दिली. एक मजलेवर त्यांचा मुक्काम असल्याचे सांगितले. रावणाने सीतेला पळवून नेण्यासापासून रावण वध वगैरे सर्व इतिहास विस्तृतपणे त्याने भरताला सांगितला. भरताला अत्यंत आनंद झाला. तो ताडकन उभा राहिला. भराभरा आज्ञा सुटू लागल्या. आज्ञा घेऊन स्वार दौडू लागले. श्रीरामांच्या स्वागतासाठी अयोध्या नगरी अमरावती प्रमाणे सजवण्याची जबाबदारी त्याने शत्रुघ्नावर टाकून त्याला रवाना केले. श्रीरामांच्या दर्शनाची अनावर ओढ मनात ठेवूनच कर्तव्य पूर्ण करण्यासाठी तो अयोध्येत निघाला. सुवर्ण रथासह चतुरंग दल सिद्ध करून गायक, वादक, भाट, चारण, यांच्यासह भरत श्रीरामांना सामोरा जाण्यासाठी मंगल वाद्ये वाजवीत निघाला.

दोन्ही भावांची अपूर्व भेट झाली. एकमेकांना दृढ मिठी मारून दोघे बराच वेळ उभे होते. भरताने लक्ष्मणाला पण आलिंगन दिले. त्याने सुग्रीव व बिभीषणाला पण आलिंगन दिले. भेटीचा सोहळा संपला. भरताने श्रीरामांना सांगितले-

'रामा, आता तुझे राज्य तू सांभाळ. मला माझ्या वचनांतून मुक्त कर. तुझे राज्य सांभाळताना माझ्याकडून काही प्रमाद घडला असेल तर मला क्षमा कर.'

आनंदाच्या उमाळ्याने भरताला पुढे बोलावेना. सूर्योदयाला अयोध्येत प्रवेश करण्यासाठी सारे दल रातोरात अयोध्येकडे निघाले.

कथासार

जगाच्या इतिहासाने राज्य मिळविण्यासाठी भावाला भावाच्या जिवावर उठल्याची, प्रत्यक्ष बापाला कैदेत टाकल्याची अनेक उदाहरणे बघितली आहेत. पण विनासायास पायाशी चालून आलेले राजपद मोठ्या भावाच्या प्रेमाखातर हसत सोडून देणारा भरतासारखा राजकुमार

फक्त भारतातच होऊ शकतो. मोठ्या भावाने आग्रह करून चौदा वर्ष सांभाळायला लावलेली सत्ता सर्व मोहपाश तोडून एका क्षणात भावाच्या पायावर वाहणारा भरत म्हणूनच विरक्तीचा, निस्पृहतेचा आदर्श आहे.

रस्त्यात सापडलेली पाच रुपयांची नोट आपल्याला मोहात पाडते. एकदा मिळाले तरी परत दुसऱ्यांदा चॉकलेट मिळावे अशी आपण खटपट करतो. कदाचित दुसऱ्यांना मिळणार नाही असा विचार मनात येत नाही. सत्ता तर दूरच, आपण गाडी, बस मधील जागा सुद्धा आपल्या पदरात कशी पडेल याच विचारात असतो. कधी असा मोह आवरेनासा झाला तर भरताची आठवण करा. बघा. लोकांची तुमच्याकडे पाहण्याची दृष्टीच बदलून जाईल.

६. आदर्श पत्नी : **सीता**



श्रीरामांना उद्या यौवराज्याभिषेक होणार असल्याची बातमी दासींनी दिली आणि जानकीच्या आनंदाला पारावार राहिला नाही. नंतर स्वतः कुलाचार्य भगवान वसिष्ठ मुनींनी येऊन तिला तिने युवराज्ञी होण्यापूर्वी करावयाची व्रते व आचरण्याचे उपवासादी नेम सांगितले. भल्या पहाटे विधींसाठी तयार राहण्यास सांगितले. पण दुसरा दिवस उजाडला तरी अभिषेक विधीसाठी चलण्यासाठी निरोप घेऊन कोणीच दूत आला नाही. जानकी पहाटेपासून वसिष्ठांच्या सूचनेप्रमाणे तयार होऊन बसली होती. वाड्यात सर्वत्र विचित्र शांतता पसरली होती. अभिषेकाच्या धामधुमीचा लवलेश कुठे दिसत नव्हता. अखेर ही कंटाळवाणी प्रतीक्षा संपली. प्रतिहारींनी श्रीराम महालात येत असल्याची वर्दी दिली. श्रीराम आले. सीतेने त्यांना आसन दिले. त्यांची मुद्रा रोजच्यासारखी हसरी व प्रसन्न नव्हती तर काहीतरी दृढ निश्चय केल्याप्रमाणे करारी व गंभीर होती.

'जानकी, माझ्या ऐवजी भरताला अभिषेक करण्याची आणि मला चौदा वर्षे वनवासात जाण्याची पिताश्रींनी आज्ञा दिली आहे. त्याप्रमाणे मी वनवासाला निघत आहे. मी तुझा निरोप घेण्यासाठी आलो आहे.'

'आपण निर्णय घेतला म्हणजे तो पूर्ण विचाराअंती आणि योग्य असाच असणार परंतु हे अचानक कसे काय घडले मला सांगाल का?'

श्रीरामांनी कैकेयीच्या वराची वगैरे सर्व कथा तिला सांगितली. सोबत लक्ष्मण येणार असल्याचे पण सांगितले आणि निघण्यासाठी तिची अनुज्ञा मागितली. त्यावर सीता म्हणली-

'माझा निरोप घेण्याचा प्रश्नच येत नाही. मी जर आपल्याला सोडून मागे राहणार असेन तरच निरोप घेण्याचा प्रश्न. मी तुम्हा वेगळी नाही. जेथे राघव तेथेच सीता असेल. मग तो राजवाडा असो वा अरण्य. जे आपण खाल तेच मी खाईन. जसे आपण रहाल तसेच मी राहीन. मी सुद्धा तुमच्या सोबत येणार आहे.'

'वनवासातील कष्ट तुझ्या नाजूक शरीराला सोसवणार नाहीत. वनवास म्हणजे वनविहार नाही. तिथे दास-दासी, सेवक, सैनिक नाहीत. सुग्रास अन्न वा शय्या नाही. रहाण्यासाठी पक्के घर नाही. ऊन, वारा, पाऊस, थंडी तुला सोसवणार नाही. माझ्या अनुपस्थितीत तूच माझ्या मातापित्यांची सेवा करायची आहेस. कैकेयी पासून त्यांचे रक्षण तूच करणार आहेस. म्हणून तू तेथेच थांबले पाहिजे.'

माझ्या शरीराला निसर्गाच्या कोणत्याही कोपाचा काही त्रास होणार नाही. आपण जवळ असताना काही त्रास झाला तरी तो मला आनंदाने सहन होईल. मी तुमच्या पासून दूर सुखात राहीन अशी आपली समजूत असेल तर तो भ्रम आहे. माझ्या सोबत येण्याने आपली कुठलीच अडचण होणार नाही. माझ्यासाठी तुम्हांला हळू चालावे लागणार नाही. मी तुमच्याच चालीने चालीन. तुम्ही जसे ठेवाल तशी राहीन. पण तुमच्या शिवाय क्षणभर सुद्धा जिवंत राहणार नाही.'

श्रीरामांनी सीतेला सासूसाऱ्यांविषयी तिचे कर्तव्य, घरातील मोठी सून, ज्येष्ठ राजकुमाराची राणी इ. म्हणून असलेल्या तिच्या कर्तव्याची तिला जाणीव करून दिली. त्याचप्रामाणे अरण्यात होणारे कष्ट तिला तपशीलवार सांगून अरण्यवास किती खडतर व कष्टदायक आहे हे परोपरीने समजावून सांगितले. सर्व ऐकून शेवटी सीता म्हणाली-

'सून म्हणून, कन्या म्हणून, राणी म्हणून माझी जी कर्तव्ये आहेत, त्या सर्वांपेक्षा पत्नी म्हणून असणाऱ्या माझ्या कर्तव्यांना सर्वात प्राधान्य आहे. त्या पुढे बाकी सर्व कर्तव्ये दुय्यम आहेत. आपण सोबत असताना आपण वर्णन केलेल्या कोणत्याही त्रासाची मला तमा नाही.

मी सारे आनंदाने सहन करीन. या त्रासापेक्षा मला आपल्या प्रतिष्ठेची काळजी आहे. कोणी आपला अपमान केलेला अथवा आपल्या संबंधी कोणी वाईट बोललेले मला विषासमान आहे. माझ्या माहेरच्यांनी, वनवासातील पशू व राक्षसांपासून माझे रक्षण करण्यास आपण असमर्थ होतात म्हणून मला राजवाड्यात ठेवून एकटेच वनात गेलात असे म्हटलेले आणि तातांनी, मी एका वीर पुरुषाला नव्हे तर काळपुरुषाला माझी मुलगी दिली असे म्हणून शोक केलेला मला मृत्यूपेक्षा भयंकर शिक्षा वाटेल. मी तुमच्या पासून दूर राहू शकत नाही. मला सोबत न्याच.'

सीतेचा दृढ निश्चय आणि तिने पुढे केलेली बिनतोड कारणे पाहून श्रीरामांनी तिला सोबत येण्यास अनुमती दिली. आपल्या पतीप्रमाणे ती सुद्धा वल्कले नेसू लागताच महर्षी वसिष्ठांचा संयम सुटला. ते म्हणाले-

'रामा, कैकेयीच्या वराप्रमाणे सीतेला वनवासात जाणे बंधनकारक नाही. तुझ्याप्रमाणे वनवासाचे नियम तिला लागू नाहीत. त्यामुळे तिने वल्कले नेसण्याची गरज नाही. तिने वनवासात सुद्धा सुखकर वस्त्रे, युवराज्ञी प्रमाणे सर्व अलंकार घालून सदैव असावे अशी मी आज्ञा करीत आहे.'

'गुरुदेव, आपली आज्ञा म्हणजे मला प्रत्यक्ष देववचन आहे. परंतु जसे माझे पती राहतील तसेच राहण्याचा, तेच खाण्याचा माझा निश्चय आहे. आपला उपमर्द करण्याची माझी इच्छा नाही. आपण कृपया मला अशी आज्ञा देऊ नये. मी अशीच ठीक आहे.'

नाजूक, कोमल सीतेच्या अंगावरची वल्कले, वसिष्ठांची आज्ञा आणि सीतेचे त्यांना दिलेले उत्तर ऐकून सारी शक्ती पणाला लावून राजा दशरथ उठून बसले, सारे बळ एकवटून म्हणले-

'मैथिली, गुरु वसिष्ठ योग्य तेच बोलले. तुला वल्कले धारण करण्याची किंचितही गरज नाही. तू तलम वस्त्रे आणि अलंकार घातल्याने तुझ्या पतिनिष्ठेस बाधा येते असे तुला वाटत असेल तर तुला पित्याच्या स्थानी असलेला हा तुझा सासरा आपल्या प्राणांची शपथ घालून तुला आज्ञा करतो की तू वनवासात जरी गेलीस तरी राज्यकन्येसारखी सर्व शृंगार व अलंकार लेवूनच जाशील.'

दशरथाने आज्ञा करून सीतेसाठी उत्तमोत्तम वस्त्रे व अलंकार मागवून तिला धारण करण्यास लावले. नंतर राजरथात बसून वल्कलधारी श्रीरामांच्या सोबत सालंकृत जानकी वनवासाला निघाली. चित्रकूट पर्वत असो अथवा दंडकारण्य ती आपल्या पतीबरोबर वनवासातील

सर्व कष्ट सोशीत आनंदाने राहत होती. एवढेच नव्हे तर कुटीच्या भोवती फुलझाडे आणि वेली वाढवून, विविध प्राणी पक्षी पाळून तशाही परिस्थितीत ती आनंद निर्माण करीत राहिली. श्रीरामांनी राक्षस निर्दालनाच्या चालवळेल्या सत्राने आणि शूर्पणखेच्या विटंबनेने चिडलेल्या रावणाने कपटाने तिला पळवून नेले. रावण तिला आकाशमार्गाने पळवून नेत असताना तिने काही दागिने आपला पदर फाडून त्यात बांधून युक्तीने ऋष्यमूक पर्वतावर टाकले. ते दागिने तिचा शोध घेत आलेल्या श्रीरामांना वानरांनी दाखवले. त्यामुळे सीता शोध थोडा सोपा झाला.

लंकेत आणून रावणाने सीतेला अशोक वनात ठेवले. तो रोज येऊन तिला लग्नाची मागणी घालायचा. पण सीता रोज त्याचा धिक्कार करून परत धाडायची.

रावण आल्याबरोबर ती गवताची एक काडी आपल्या चेहऱ्यासमोर धरीत असे. त्या काडीचा त्याच्या मनात एवढा धाक बसला होता की त्याला सीतेला स्पर्श करण्याची सुद्धा हिम्मत होत नव्हती. एके दिवशी आपल्या सर्व वैभवाचे प्रदर्शन सीतेसमोर करून तिच्या मनात भणंगावस्थेत भटकणाऱ्या तिच्या नवऱ्याविषयी द्वेष निर्माण करावा आणि आपला मोह पाडावा असे रावणाला वाटले.

मध्यरात्रीच्या सुमारास अभ्यंग स्नान करून अनेक प्रकारच्या उटी आणि सुगंधी अत्तरे लावून, जरतारी वस्त्रे, हिऱ्या मोत्यांचे, सोन्याचे अलंकार, रत्नजडित मुकुट, मखमली चढाव असा थाट करून सोबत मंदोदरीसह आपल्या अन्य शंभर स्त्रिया, ज्यांनी अतिशय मैल्यवान वस्त्रे व दागिने घातले होते, फुलांच्या माळा, गजरे यांनी सजल्या होत्या, त्यांना सोबत घेऊन रावण सीतेला भेटण्यास निघाला. सर्व स्त्रियांनी हातात सोन्याचे मोठे मोठे दीप धरले होते. समोर वाद्ये वाजत होती. नर्तकी नाच करीत होत्या. सेवक मखमली पायघड्या घालत होते. अशा थाटात तो सीते समोर आला.

'बघ, सीते बघ. माझे वैभव पहा. पहा माझ्या स्वर्गातल्या अप्सरांपेक्षा सुद्धा सुंदर शंभर, स्त्रिया, पहा त्यांचे उंची कपडे, अलंकार आणि थाटमाट पहा. तू माझी राणी हो, मंदोदरीसह सर्व स्त्रिया तुझ्या दासी होऊन राहतील. देव, यक्ष, गंधर्वांचा पराभव करून मिळविलेले हे चौदा चौकड्यांचे राज्य, हा सोन्याचा कोट आणि सोन्याचेच वाडे अशी सजलेली लंकानगरी, तिच्यातील अगणित संपत्तीसह तुझ्या पायाशी येईल. मोठे मोठे राक्षसवीर तुझ्या इशाऱ्यासरशी प्राणांची बाजी लावून तुझी इच्छा पूर्ण करतील. त्या भिकारड्या रामाच्या नावाने कुढत बसू नकोस. काय दिले त्याने तुला? हा वनवास, कष्ट, ही संकटे या व्यतिरिक्त देण्यासाठी त्याच्याकडे आहे तरी काय? विचार कर, माझी पत्नी होण्याचे मान्य कर आणि हे सारे वैभव प्राप्त करून घे.

'अरे दुष्ट निशाचरा, कोणासमोर आपल्या या अपवित्र संपत्तीचे हे ओंगळवाणे प्रदर्शन मांडतो आहेस?

'मी राजा जनकाची कन्या आणि महाराज दशरथाची सून आहे. या चमकणाऱ्या दगडांची तू माझ्यासमोर मातब्बरी दाखवू नकोस. असे खडे आमच्या राज्यातील पोरे पोरी खेळताना वापरतात. स्वतःच्या पराक्रमाची तुला घमेंड आहे, पण लक्षात ठेव, तुझ्या आज्याला पाताळात तोंड लपवून बसायला लावण्याऱ्या राजा दशरथाची मी सून आहे. देवांना मदत करतानाचा त्यांचा पराक्रम तू विसरलास की काय? दुसऱ्याचे लुटून, ओरबाडून खाणाऱ्या स्वार्थी राक्षसा, तुला सहजासहजी मिळणारी राज्यसंपदा तत्त्वासाठी ठोकरून वनवास पत्करण्यातील थोरवी काय समजणार? अरे या शंभर स्त्रिया बिचाऱ्या तुझ्या धाकाने थरथर कापत, तू त्यांची सवत करायला निघालेल्या स्त्री समोर लाचार होऊन उभ्या आहेत. बाहुल्यांना सजवावे तसे तू त्यांना सजवले आहेस अरे दुष्टा, त्यांना सुद्धा वश करताना तू असेच अमिष दाखवले असशील.

पण लक्षात ठेव. मी जानकी आहे. मर्यादा पुरुषोत्तम, महावीर धनुर्धर श्रीरामांची अर्धांगिनी आहे. त्यांची मूर्तिमंत, चालती बोलती प्रतिष्ठा आहे. पाप्या, तू त्यांच्या प्रतिष्ठेचा जाणून बुजून अपमान केला आहेस. त्याचे प्रायश्चित्त तुला आपल्या प्राणांनी द्यायला लावल्याशिवाय श्रीराम स्वस्थ बसणार नाहीत. माझ्या लेखी तुझी आणि तुझ्या वैभवाची किंमत धुळीच्या कणाइतकी सुद्धा नाही. माझ्या नजरेसमोरून दूर हो आणि पुन्हा असे दुःसाहस करू नकोस.'

सर्व स्त्रिया व सेवकांसमोर सीतेने पाणउतारा करताच रावणाचा चेहरा पडला. पण उसने अवसान आणून तो पुन्हा म्हणाला-

'सीते, इतक्या दिवसांचा बंदिवास सोसून सुद्धा तुझी मिजास उतरली नाही. मी कोणाही स्त्रीवर आजवर जबरदस्ती केलेली नाही. दोन महिन्यांची मी तुला मुदत देतो. दोन महिन्यात माझी बायको होण्यास कबूल झाली नाहीस तर तुझ्या या कोवळ्या शरीराचे तुकडे करून त्या पासून मिष्टान्न बनवून खाईन. मी नरमांस खात नाही. पण तुला अद्दल घडविण्यासाठी मी ते सुद्धा करीन.'

असे म्हणून पाय आपटीत तो महालात निघून गेला. हा सर्व प्रकार झाडावरून हनुमान पहात होता. सर्वत्र सामसूम झाल्यानंतर त्याने सीतेसमोर येऊन श्रीरामांचा संदेश दिला. सीता अत्यंत आनंदित झाली. तिला नवजीवनच मिळाले. पुढे श्रीराम सागर ओलांडून लंकेत आले. सर्व राक्षस कुळासह रावणाचा नाश झाला. आपल्या पतीसह ती अयोध्येस परत आली. श्रीरामांना राज्याभिषेक झाला. जानकी सिंहासनावर त्यांच्या डावीकडे विराजमान झाली. सर्व कष्ट, दुःख संपले, सुखाचे दिवस आले. सीता गर्भवती झाली. तिला डोहाळे लागले. तिला उघड्या हवेवर डोंगर दऱ्यात रानावनात फिरण्याची इच्छा होऊ लागली. तिचे सर्व हट्ट पुरवण्यात श्रीराम तत्पर होते. एके दिवशी सायंकाळी लक्ष्मण तिच्या महालात आला आणि त्यांनी उद्या सूर्योदयाबरोबर तिला घेऊन गंगेच्या पलीकडे वनात जायचे असल्याचे सांगून तयार राहण्यास सांगितले. सकाळी निघताना ती म्हणाली-

'लक्ष्मणा, आजपर्यंत श्रीरामांनी माझे सारे लाड पुरवले. माझे कौतुक केले.त्याला तू साक्षीदार आहेस. बघ आज सुद्धा त्यांनी माझ्यासाठी स्वतःचा सुवर्ण रथ पाठवला आहे. थांब, मी त्यांचा निरोप घेऊन येते.'

'नको. त्याची गरज नाही. श्रीराम अन्य महत्त्वाच्या कामासाठी अयोध्येबाहेर गेले आहेत. त्यांची भेट होणार नाही.'

आनंदात असलेल्या सीतेला लक्ष्मणाचा भरून आलेला आवाज किंवा अडखळते शब्द जाणवलेच नाहीत. ती रथात बसली. याच वाटेने पूर्वी ती वनवासाला गेली होती. त्यावेळच्या आठवणी ती लक्ष्मणाला सांगू लागली. जुन्या खुणा ओळखू लागली. लक्ष्मण एखाद दुसरा शब्द बोलत होता. तिच्या नजरेला नजर देत नव्हता. पण स्वतःतच मग्न असणाऱ्या सीतेला ते जाणवलेच नाही. निषादराज गुहाचा आतिथ्य सत्कार घेऊन त्यांनी रथासह गंगा पार केली सूर्य मावळतीकडे झुकलेला असताना ते महर्षी वाल्मीकिंच्या आश्रमाजवळ आले. एका करंज वृक्षापाशी लक्ष्मणाने रथ थांबवला. सीतेला रथातून उतरण्यास विनंती केली. तिला त्या वृक्षाखाली शिळेवर बसवले. हात जोडून डोळ्यात पाणी आणून तो तिच्या समोर उभा राहिला.

'लक्ष्मणा, काय प्रकार आहे हा? तू असा दीन चेहरा करून का उभा आहेस? डोळ्यात पाणी काय म्हणून? सारे कुशल आहे ना? सांग, मला नीट सांग, मला आता धीर धरवत नाही.'

लक्ष्मणाच्या तोंडून हुंदकाच आला. सारा धीर गोळा करून त्याने स्वतःला सावरले. भरल्या गळ्याने तो म्हणाला-

'जानकी, श्रीरामांनी तुझा त्याग केला आहे आणि तुला राज्याबाहेर सोडून देण्यासाठी म्हणून येथे मी आणले आहे. प्रजारंजनासाठी स्वतःच्या आप्तांच्या सुखाची तमा न बाळगण्याची आणि प्रसंगी त्याग करण्याची श्रीरामांची प्रतिज्ञा तुला माहीतच आहे. याच कारणासाठी त्यांनी लंकेत तुझ्याकडून अग्निदिव्य करवले. स्वतः श्रीरामांना तुझ्या पवित्रतेची आणि शुद्धतेची संपूर्ण खात्री आणि तुझ्या दुःखाची संपूर्ण कल्पना असूनसुद्धा श्रीरामांनी केवळ प्रजारंजनासाठी हा निर्णय घेतला आहे. मला स्वतःच्या प्राणांची शपथ घालून हे दुष्ट कार्य पार पाडण्यासाठी आज्ञा दिली आहे. मला त्यांनी प्रतिवाद सुद्धा करू दिला नाही. जानकी, तू गंगेपेक्षा पवित्र असून सुद्धा एका यःकश्चित धोब्याने तुझ्या चारित्र्याविषयी संशय व्यक्त केला, त्यामुळे त्यांनी तुझा त्याग करण्याचा निर्णय घेतला आहे. तू त्यांचे एकपत्नी व्रत जाणतेसच. त्यांचे मन तू समजून घेशील. आणि त्यांच्या यश व कीर्तीला बाधा आणणार नाहीस याची त्यांना पूर्ण खात्री आहे. माझ्या पूर्वजन्मीच्या पापाचे फळ म्हणून हे अभद्र काम मला करावे लागत आहे. मला क्षमा कर.'

सीतेवर जणू वीज कोसळली. क्षणभर तिला काहीच कळेना. हळू हळू तिच्या लक्षात सारा प्रकार आला. तिच्या शोकाला पारावार उरला नाही. ती जोर जोराने रडू लागली. जुन्या

आठवणी काढून शोक करू लागली. तिचा शोक, तो आक्रोश लक्ष्मणाला सहन होईना. स्वतःच्या असहाय्यतेचा त्याला भयंकर संताप आला. आपला संताप घोड्यांच्या पाठीवर काढत, रडक्या सीतेला तसेच रानात सोडून त्याने धुळीचे लोट उठवत रथ अयोध्येकडे पिटाळला.

आजूबाजूला चिटपाखरू नसलेल्या त्या रानात सीता बराच वेळ शोक करीत राहिली. थोड्या वेळाने तिने स्वतःला सावरले. ती स्वतःशीच म्हणाली-

'याशिवाय दुसरा पर्याय नसेल म्हणून, हे नाथ, तुम्ही हा निर्णय घेतलात याची मला खात्री आहे. आपले कर्तव्य पार पाडण्यासाठी आपण माझा त्याग केलात याचे मला दुःख नाही, कारण आपल्या भावना मी जाणते. मनाने आपण सदैव माझ्या जवळ आहात. फक्त आपण स्वतः मला निरोप दिला असतात तर मला याही परिस्थितीचा आनंदाने स्वीकार करता आला असता. दुःख फक्त याचेच आहे. आपल्या वंशाचा अंकूर माझ्या पोटात आहे. त्याला आपल्या सारखाच समर्थ करण्याची प्रतिज्ञा ही आपली पत्नी, जानकी सर्व वनदेवतांना आणि अस्ताचलाला टेकलेल्या आपल्या कुळाच्या मूळ पुरुषाला साक्षी ठेवून घेत आहे.'

अंधार पडण्याच्या सुमारास सीता महर्षी वाल्मिकींच्या आश्रमात त्यांच्या समोर वंदन करून उभी राहिली.

'जनकल्याणाचे व्रत घेतलेल्या माझ्या पतीला, आपल्या कार्यात पत्नीचा सहवास अडचणीचा वाटू लागल्याने तिचा त्याग केलेली अशी मी एक वनदेवता आहे. त्याचा वंश माझ्या पोटात आहे. मला मुलगी मानून आपण माझे माहेरपण करावे.'

त्रिकालदर्शी महर्षी वाल्मिकींनी तिच्या मस्तकावर हात ठेवला आणि तिला आश्रमात घेऊन गेले.

७. आदर्श पत्नी : **उर्मिला**

वनवासाला निघण्यापूर्वी निरोप घेण्यासाठी लक्ष्मण उर्मिलेच्या महालात आला. सोबत सुमित्रा माता सुद्धा होती. दासी व सेवकांकडून सारे वृत्त तिला समजले होते. त्यामुळे ती सुद्धा अंगावर वल्कले घालून त्याची वाट पाहात होती. लक्ष्मण येताच तिने त्याला चौरंगावर बसवले. कपाळाला मंगल टिळा लावून निरांजनाने ओवाळले. नंतर त्याचे पाय धुऊन आपल्या पदराने पुसले. लक्ष्मण सर्व सोपस्कार मूकपणे करून घेत होता. नंतर ती समोर उभे राहून नम्रपणे म्हणली-

'आपणासोबत चलण्याची माझी सर्व सिद्धता झाली आहे. चलावे.'

'उर्मिले तू कोठे चलण्याचे म्हणत आहेस?'

'आपल्या सोबत वनवासात.'

'तुला वनवासातील कष्ट सोसणार नाहीत. त्यात फार मोठा धोका आहे. तू येथेच रहावेस.'

'ज्या पित्याचे रक्त सीतेच्या अंगात खेळते आहे त्याच पित्याचे रक्त माझ्या सुद्धा अंगात खेळते आहे. जे कष्ट सीता आनंदाने सहन करू शकते त्या कष्टांना मी घाबरते असे तुम्हांला वाटते की काय? सर्व त्रास व कष्ट सहन करण्याची माझी सुद्धा क्षमता आहे. मी सुद्धा वनात आपल्या सोबत येणार.'

उर्मिलेचा तो आत्मविश्वासपूर्ण आवेश बघत लक्ष्मण काही वेळ गप्प राहिला. थोड्या वेळाने अगदी सावकाशपणे तो म्हणाला.

'उर्मिले, तुझ्या क्षमतेची खात्री कोणाला नाही? तुझे तेज, तुझे आत्मबळ मी जाणतो. पण उर्मिले, मी स्वतः आपल्या खुशीने दास्य वृत्ती स्वीकारली आहे. श्रीराम व जानकीची सेवा करण्याचे मी व्रत घेतले आहे. मी वनात तुझ्याकडे कसे लक्ष देऊ? तू सोबत असलीस तर माझे चित्त विचलित होईल. मी अनन्य भावाने आणि पूर्ण क्षमतेने त्यांची सेवा करू शकणार नाही. माझी पत्नी म्हणून तुझे सुद्धा माझ्या कार्यात मला मदत करणे हे कर्तव्य आहे. मी तेथे श्रीराम व जानकीच्या सेवेत असताना माता कौसल्या व पिताश्री दशरथांची सेवा कोण करणार? माझी ही उणीव माझी पत्नी म्हणून तुलाच भरून काढली पाहिजे. तू या कार्यात कमी पडणार नाहीस याची मला खात्री आहे. तू येथेच राहून तुझे हे कर्तव्य करणे हाच तुझा पत्नी धर्म आहे. पिताश्रींनी सीतेला वनवासात सालंकृत राहण्याची आज्ञा केली आहे. तू सुद्धा तिचेच अनुकरण करून रहा. आपल्या दोघांसाठी ही तपश्चर्याच आहे. मी वनात करीन, तू येथे राजवाड्यात कर. चौदा वर्षांनंतर आपल्या तपश्चर्येचे फळ निश्चित मिळेल.

यावर बोलण्यासारखे उर्मिलेकडे काही नव्हतेच. पतीची इच्छा तिच्यासाठी आज्ञा होती. न ओलांडता येणारी, न मोडता येणारी. आपल्या साऱ्या इच्छा, भावना, शब्द, स्वप्ने आपल्या मनातच कोंडून ठेवून तिने लक्ष्मणाची चरणधूळ मस्तकी लावली. लक्ष्मणाची पाठ फिरताच मात्र वेल कोसळावी तशी सुमित्रा मातेच्या कुशीत ती कोसळली. वादळात हलणाऱ्या केळी सारखी गदगदत. हुंदक्याचा आवाज सुद्धा होणार नाही याची खबरदारी घेत.

कथासार

दोन अलौकिक पुरुषांच्या दोन अलौकिक पत्नी. दोघीही दृढ निर्धारी आत्मसंयमी. पण एक तेजस्विनी, दुसरी शांत सोशिक. ज्यांच्या बायका नवऱ्याला समजून घेऊ शकतात त्याच बायकांचे नवरे फार मोठे कर्तृत्व करू शकतात.

लो. टिळक, स्वा. सावरकर एवढे मोठे राष्ट्र कार्य करू शकले. महर्षी कर्वे प्रचंड समाजकार्य करू शकले, कारण त्यांच्या बायका समाजापुढे न येता त्यांच्यासाठी झिजत राहिल्या. कुठलाही त्रागा वा गाजावाजा न करता त्यांनी पतीला यासाठी जे बळ दिले ते सीतेच्या आणि उर्मिलेच्या चरित्रानेच. शहाजी राजांपासून दूर राहून जिजाऊने शिवबा घडवला तो लवकुशांना वाढवणाऱ्या सीतेपासून स्फूर्ती घेऊनच. या अमीट जीवनमूल्यांमुळेच रामायण आज सुद्धा अनुकरणीय राहिले आहे.

८. आदर्श दूत : **श्री हनुमान**



ऋष्यमूक पर्वताच्या शिखरावरून फार दूरवरचा प्रदेश नजरेत येत होता. डोंगराच्या पायथ्याशी जिथे दाट झाडी संपून पंपा सरोवराकडे जाणारी वाट दिसत असे त्या वाटेवर नजर ठेऊन बसलेल्या वानर सैनिकास रोजच्यापेक्षा वेगळे दृष्य दिसले आणि त्याने ताबडतोब वानरराज सुग्रीवाचे लक्ष तिकडे वेधले. वल्कले नेसलेले पण सर्व शस्त्रास्त्रांनी सुसज्ज असे दोन वीर त्या वाटेवरून येताना दिसत होते. कायम वालीच्या भीतीच्या दडपणाखाली वावरणारा सुग्रीव घाबरून गेला. 'मला वाटते वालीने मला मारण्यासाठी आता या दोन माणसांची योजना केलेली असावी. त्यांचे तेज आणि शस्त्रे पाहून मला फारच भीती वाटू लागली आहे. हनुमाना,

काय प्रकार आहे ह्याची तू स्वतः खात्री करून घे. जर ते शत्रू पक्षाचे असतील तर त्यांचा नाश कर, न जमले तर रानातल्या चुकीच्या वाटा दाखवून त्यांना दूर पिटाळून लाव.'

आपल्या राजाची आज्ञा होताच हनुमान झपाट्याने पर्वतावरून खाली आला. तो पर्यंत ते दोघे शस्त्रधारी जंगल प्रदेशात पोहोचलेच होते. प्रत्यक्ष पर्वतावर चढण्यापूर्वी थोडा दम खाण्याच्या हेतूने ते एका झऱ्याच्या काठावरील दाट सावलीच्या झाडाखाली विश्रांती घेत होते. हनुमान त्याच झाडाच्या एका उंच फांदीवर पानांच्या आड दडून त्यांचे निरीक्षण करू लागला. दोघेही जरी सारखेच दिसत असले तरी त्यातला जो मोठा असावा तो अत्यंत तेजःपुंज आणि बुद्धिमान भासत होता. भरदार शरीर, रुंद खांदे, लांब बाहू, झाडाला टेकून ठेवलेले नजरेलाच अवजड जाणवणारे धनुष्य आणि निरनिराळ्या बाणांनी खच्चून भरलेला भाता सारे काही त्याच्या असामान्य वीरश्रीची साक्ष देत होते. धाकटा तेजस्वी पण शालीन आणि नम्र भासत होता. मात्र त्याच्या कपाळावरील शीर त्याच्या शीघ्रकोपी स्वभावाची साक्ष देत होती. हे दोन्ही वीर कोणाचे अंकित राहून काम करणारे वाटत नव्हते. त्यांचे आगळे तेज त्यांच्या स्वतंत्र व समर्थ व्यक्तिमत्त्वाची साक्ष देत होते. त्यांचा संवाद नीट ऐकता यावा म्हणून हनुमान पानांच्या सळसळीच्या आवाजाचा लाभ उठवत थोडा खालच्या फांदीवर आला. त्यांच्या बोलण्यात सुग्रीव, रावण, अयोध्या, सीता असे अनेक उल्लेख येत होते. हनुमानाने ताडले हे तेजस्वी वीर म्हणजेच अयोध्येचे वनवासी झालेले राजकुमार असले पाहिजेत. सीता नावाची थोरल्याची बायको रावण नावाच्या राक्षसाने कपटाने पळवून नेली असावी आणि तिच्या शोधात कदाचित सुग्रीवाचे सहाय्य होईल म्हणून ते सुग्रीवाला शोधत आहेत. या अडचणीत असलेल्या वीरांना सहाय्य करून त्या बदल्यात त्यांच्या सहाय्याने आज निर्वासित असलेल्या महाराज सुग्रीवांना त्यांचे गेलेले राज्य परत मिळवून देता येणे शक्य असल्याचे त्या बुद्धिवान मंत्र्याने लगेच ताडले.

दम खाऊन ते पुढील वाटचालीस सुरुवात करणार एवढ्यात एका तापसाचे रूप घेऊन हनुमान त्या दोघाना सामोरा आला. आपल्या चतुर संभाषणात लक्ष्मणाला गुंतवून त्याने हळूहळू त्यांची सारी माहिती काढून घेतली. त्याच्या अत्यंत शुद्ध, समर्पक आणि मर्यादशील बोलण्याने प्रभावित होऊन श्रीरामांनी सुद्धा लक्ष्मणाला, त्याला सर्व माहिती देऊन त्याची माहिती काढून घेण्याची सूचना केली. सरते शेवटी श्रीराम म्हणाले- 'हे ब्राह्मणा, इतका वेळ तू जे बिनचूक, शास्त्रशुद्ध आणि चुतराईचे बोलत आहेस त्यावरून हे स्पष्ट होते की तू सामान्य

तापस नाहीस. कोणी विद्वान राजकारणपटू दिसतोस.' हे ऐकताच हनुमानाने आपले मूळ रूप प्रकट केले..

'प्रभू, मी वायुपुत्र हनुमान. महाराज सुग्रीवांचा मंत्री. त्यांच्या ज्येष्ठ भावाने जुलुमाने त्यांचे राज्य व पत्नी हिरावून घेऊन त्यांना देशोधडीस लावले आहे. आपण आपल्या सामार्थ्याच्या जोरावर त्यांना त्यांचे राज्य परत मिळवून देण्यास सहाय्य करावे. सीता मातेच्या शोधात आणि सुटकेत माझे महाराज सर्वशक्तीनिशी आपल्याला सहाय्य करतील.

हनुमान, श्रीराम व लक्ष्मण यांना सुग्रीवाकडे घेऊन गेला आणि त्याने उभयतांमध्ये मैत्री घडवून आणली. दोघांनी परस्परांना मदत करण्याची प्रतिज्ञा घेतली. या मैत्रीचे फळ म्हणून सुग्रीव किष्किंधेचा राजा झाला आणि श्रीरामांना सीतेला मुक्त करण्यात वानर सैन्याचे अमोल सहाय्य झाले.

लंका दहन



इंद्रजिताने सोडलेल्या ब्रह्मास्त्राचा मान राखण्यासाठी हनुमानाने स्वतःला बांधून घेतले. त्या निमित्ताने जाड दोरखंडांनी करकचून आवळून हनुमानाला रावणासमोर उभे करण्यात आले. त्याने अशोकवनाची धूळधाण उडवल्यामुळे आणि प्रचंड राक्षस सेनेसह अनेक राक्षस वीर ठार केल्यामुळे रावण अतिशय खवळला होता. खाऊ की गिळू अशा नजरेने तो त्याच्याकडे बघत होता. संतापाने त्याच्या डोळ्यातून जणू ठिणग्या उडत होत्या. त्याला सिंहासनावर स्वस्थ बसणे शक्य होत नव्हते. कसे बसे त्याने स्वतःला आवरून धरले होते. आपल्या प्रहस्त नावाच्या एका मंत्र्याला त्याने हनुमानाची चौकशी करण्याची आज्ञा केली. हनुमानाने उत्तर दिले-

'माझे नाव हनुमान. मी वायुपुत्र असून किष्किंधापती सुग्रीव यांचा मी मंत्री आहे. अयोध्येचा वनवासी राजा श्रीराम आणि सुग्रीव यांची मैत्री झाली असून श्रीरामांच्या कृपेने वालीचा वध होऊन सुग्रीव किष्किंधेचे राजे झाले आहेत. त्यांच्याच आज्ञेने सारी वानर सेना सीतेच्या शोधासाठी दशदिशा धुंडाळीत आहे. हे असुराधिपती दशानना, त्या श्रीरामांच्या आज्ञेनेच त्यांचा दूत म्हणून सीतामाईंना शोधण्यासाठी मी तुझ्या राजधानीत आलो आहे. मी सीतेला पाहिले. श्रीरामांचा संदेश त्यांना दिला. एकाच झेपेत शंभर योजने सागर पार करून आल्याने मी अतिशय भुकेला झालो होतो, पण राजा, तुझे सैनिक माझ्या जीवावर उठले तेव्हा स्वसंरक्षणासाठी मला नाईलाजाने त्यांना मारावे लागले. पौलस्त्या, तुला माहीतच असेल मला कोणत्याही शस्त्र किंवा अस्त्रापासून अपाय नाही. पण केवळ तुझी भेट घेऊन तुला श्रीरामांचा दूत म्हणून त्यांचा संदेश सांगण्याच्या हेतूनेच मी तुझ्या पुत्राच्या ब्रह्मास्त्राला शरण गेलो. असुरराजा, तुझे रूप, तुझी बुद्धी, तुझे शौर्य, वीर्य, वैभव सारे सारे जगात केवळ अलौकिक आहे. तुझ्याकडे फक्त सद्धर्म नाही. जर तू धर्माने वागणारा असतास तर इंद्रासह सर्व देवतांचा रक्षणकर्ता झाला असतास. पण सामर्थ्याच्या गर्वाने तुला अधर्मासाठी प्रवृत्त केले. तुझे सारे असामान्य गुण मातीमोल झाले. त्याच अधर्माने, कपटाचा आश्रय घेऊन तू श्रीरामांची पत्नी देवी सीता हिचे श्रीराम व लक्ष्मण कुटीत नसताना एखाद्या भेकड चोरासारखे हरण केलेस. लंकाधिपती रावणा, आजपर्यंत केलेल्या अधर्मावर चढवलेला हा कळस आहे. सीतेच्या रूपाने तू प्रत्यक्ष अग्नी आपल्या पदरात बांधून घेतला आहेस. हा अग्नी तुझ्यासह तुझ्या कुळाचीच नव्हे तर संपूर्ण राक्षस जातीची जाळून राख करेल. अजून वेळ गेलेली नाही. सावध हो! देवी सीतेला सन्मानपूर्वक

श्रीरामांच्या स्वाधीन कर आणि स्वतःसह आपल्या संपूर्ण जातीचे रक्षण कर, अन्यथा लवकरच श्रीराम त्यांच्या आमोघ बाणांनी तुला तुझ्या बंधू बांधवांसह यमसदनाला धाडतील. तुझी दहाही मस्तके चेंडू प्रमाणे आकाशात उडवतील. मी स्वतः महाराज सुग्रीवांचा एक सामान्य मंत्री आहे. तरी तुझे स्वतःला शूरवीर म्हणवणारे योद्धे माझ्या समोर पाला पाचोळा ठरले. माझ्यासारखे कैक वानरवीर सुग्रीव महाराजांच्या पदरी आहेत आणि श्रीरामांच्या कार्यासाठी ते स्वतःला झोकून द्यायला तत्पर आहेत. अजून विचार कर! देवी सीतेला श्रीरामांकडे सन्मानाने परत पाठव.’

हनुमानाचे ते तेजस्वी भाषण रावणाला भयानक झोंबले. त्याच्या संतापाच्या आगीत जणू तेलच पडले. त्याचा संपूर्ण तोलच गेला. त्याने आपल्या सैनिकांना हनुमानास ठार करण्याचा हुकूम केला. परंतु बिभीषणासह अनेक मंत्री मध्ये पडले आणि दूताला मारणे राजनीतीला धरून नसल्याचे त्याला परोपरीने समजावले. अखेर शिक्षा म्हणून त्याने त्याचे शेपूट पेटवून देण्यास सांगितले. पेटत्या शेपटाने जवळपास सारी लंका भस्मसात करून हनुमान श्रीरामांकडे परत आला.

हनुमंत-भरत भेट

रावणाचा वध झाला. बिभीषण लंकेचा राजा झाला. वनवासाचा चौदा वर्षाचा काळ संपण्यास काही थोडे दिवसच उरले होते. अग्निदिव्य करून स्वतःचे पावित्र्य सिद्ध केलेल्या सीतेसह श्रीराम, लक्ष्मण आणि बिभीषण, सुग्रीव व हनुमानासह सर्व प्रमुख वानरवीरांना घेऊन पुष्पक विमानात बसून अयोध्येकडे परत निघाले. अयोध्येपासून काही थोड्या कोसांवर ते थांबले. त्यांनी हनुमानास पुढे बोलावले आणि म्हणाले-

‘हनुमंता, अनेक अशक्य कामे तू माझ्यासाठी लीलया केलीस. शक्तीची असो वा युक्तीची, तू मला कायम यश आणून दिलेस. माझ्या विश्वासाला तू पूर्णपणे पात्र आहेस. आता तुला माझ्यासाठी एक खूपच नाजूक काम करायचे आहे. माणसांच्या शब्दांवरून आणि चेहऱ्यावरून तू त्यांचे अंतरंग जाणतोस. शब्दांचा वापर करताना तू कधीच चुकत नाहीस. आपल्या स्वामींचे अहित न होऊ देण्यात तू सदैव दक्ष असतोस. आदर्श दूताची सारी लक्षणे तुझ्या ठायी एकवटली आहेत. भरत नंदीग्राममध्ये संन्यस्त वृत्तीने राहत आहे. तो अत्यंत

संयमी व त्यागी आहे. पण चौदा वर्षे सत्ता उपभोगल्यानंतर माणसाचे मन बदलू शकते. त्याच्या नजरेत तुला तसा भाव दिसला तर मला लगेच कळव. जर त्याचे पूर्वीचेच भाव शुद्ध स्वरूपात टिकून असतील तर माझ्या आगमनाचे वृत्त त्याला दे.'

एका वृद्धाचे रूप घेऊन हनुमान नंदीग्रामात पोहोचला. भरत आपल्या कुटीच्या बाहेर अग्निकुंड तयार करवून घेत होता. हनुमानाने त्याच्या जवळ जाऊन, तो हे काय करीत असल्याचे विचारले. भरत म्हणाला-

'उद्या सकाळी श्रीरामांचा चौदा वर्षांचा वनवासाचा काळ पूर्ण होत आहे. जर ते दिलेल्या मुदतीत परत आले नाहीत तर मी माझ्या प्रतिज्ञेप्रमाणे अग्निप्रवेश करणार आहे.'

भरताच्या शब्दांतील सच्चेपणा, दृढता, स्वरातील प्रामाणिकपणा आणि डोळ्यांतील सात्विक भाव पाहून हनुमंताने स्वतःचे मूळ प्रकट केले आणि श्रीराम परत आल्याचे वृत्त सांगितले. राम-रावण युद्ध, लंका विजय इ. सर्व थोडक्यात सांगून आनंदाने वेड्या झालेल्या भरताला मागे ठेवून भरताचे गुणगान गात तो श्रीरामांकडे त्वरेने परत गेला.

९. आदर्श दूत : **अंगद**



सर्व वानर सेना युद्धासाठी सज्ज होती. श्रीरामांच्या एका इशाऱ्यासरशी वानरसैन्य राक्षसांवर तुटून पडण्यास तयार होते. अन्यायाच्या विरुद्ध सत्पक्षासाठी आपण झुंजणार आहोत या भावनेने त्यांच्यापैकी प्रत्येकाची छाती फुललेली होती. मस्तके ताठ होती. सत्याचे तेज त्यांच्या मुखांवर चमकत होते. अशा ऐन मोक्याच्या क्षणी श्रीरामांनी अंगदाला समोर बोलावून सांगितले.

'युवराज अंगदा, सत्याच्या रक्षणासाठी, आणि अन्यायाच्या निर्दालनासाठी सारी वानरसेना उत्सुक आहे. तुझ्यासह आणि राजा सुग्रीवासह नल, नील, जांबुवंत, हनुमान इ. असंख्य महापराक्रमी योद्धे, ही धरणी राक्षसांपासून मुक्त करण्यास आतुर आहेत. पण रावण जरी अधर्मी असला तरी तो राजा आहे. त्याच्याशी लढताना राजनीतीचे भान ठेवूनच लढले

पाहिजे. तेव्हा अंगदा, माझा दूत म्हणून तू रावणाची भेट घे. त्याला शेवटची संधी म्हणून चार सामोपचाराच्या गोष्टी सांग आणि समेटासाठी तयार कर. जर रावण सीतेला सन्मानपूर्वक माझ्या स्वाधीन करण्यास तयार असेल, तर माझ्या वतीने तू त्याला संपूर्ण अभय देण्यास मुखत्यार आहेस. विनाकारण रक्तपात दोन्ही पक्षांना हितकारक नाही.'

श्रीरामांचा दूत म्हणून अंगद रावणासमोर शिष्टाई करण्यास त्याच्या दरबारात हजर झाला. राजनीतीचे प्राथमिक सोपस्कार पूर्ण करून तो रावणाला म्हणाला-

'असुरराज, लंकेश्वर महाराज रावणांनी उग्र तपश्चर्या करून प्रत्यक्ष ब्रह्मदेवाकडून अमोघ वर मिळविल्याचे आणि त्या वरांद्वारे अलौकिक सामर्थ्य संपादन केल्याचे सारे जग जाणते. त्यांचे अजोड कर्तृत्व केवळ असाधारण आहे. परंतु दुर्दैवाने त्यांनी त्यांचे सारे सामर्थ्य सज्जनांच्या आणि धर्माच्या रक्षणासाठी न वापरता स्वतःच्या स्वार्थासाठी आणि सुखोपभोगासाठी वापरले. धर्माला पायदळी तुडवताना तमा बाळगली नाही. देवांना बंदिवासात टाकले. सज्जनांचा नाश करण्याचा अहर्निश प्रयत्न केला. लोकांचे जीव आणि संपत्तीच नव्हे तर त्यांच्या बायका-मुली हरण केल्या आणि आपल्या दासी केल्या. या सर्वांवर कळस म्हणजे अग्नीसारखी तेजस्वी आणि तितकीच पवित्र श्रीरामांची धर्मपत्नी देवी सीता, यांना कपटाने पळवून आणले.

'हे शक्तिमान लंकेश्वरा, त्याच देवी सीतेचे पती, अयोध्यानृपती श्रीराम शंभर योजने समुद्र ओलांडून आपल्या अपमानाचा डाग धुऊन काढण्यासाठी, तुझा अन्याय कायमचा नष्ट करण्यासाठी, अत्यंत पराक्रमी वानरसेनेसह तुझ्या राजधानीच्या दारात युद्धास सज्ज होऊन उभे आहेत. त्यांनी किशोर वयातच त्राटिका आणि सुबाहू सारख्यांचा सहजपणे एकट्याने वध केला. खर आणि दूषण यांचा सैन्यासह संपूर्ण नाश करताना कोणाचेही सहाय्य घेण्याची त्यांना गरज भासली नव्हती. ते महापराक्रमी श्रीराम आज अत्यंत सामर्थ्यशाली प्रचंड वानरदलासह तुझे पारिपत्य करण्यास सज्ज आहेत. हनुमानासारख्या केवळ एका वानराने तुझ्या सेनेची आणि नगरीची केलेली धुळधाण तू विसरला नसशीलच. त्याच भयाने स्वतःला महापराक्रमी म्हणवणाऱ्या तुझी वानसेनेसह समुद्र ओलांडत असतानाच श्रीरामांना रोखण्याची हिम्मत झाली नाही.

'स्वतःच्या सामर्थ्यावर संपूर्ण विश्वास आणि सत्यावर, धर्मावर अढळ निष्ठा असलेले श्रीराम राजनीतीला स्मरून तुला शेवटची संधी देत आहेत. सीतादेवींना सन्मानपूर्वक श्रीरामांच्या स्वाधीन कर आणि स्वतःसह संपूर्ण राक्षस कुळाचे विनाशापासून रक्षण कर.'

अंगदाचे भाषण ऐकून रावण डिवचला गेला आणि अंगदाला ठार मारण्यास आपल्या सैनिकांना सांगू लागला. राक्षस पुढे सरसावण्याचा प्रयत्न करताच अंगदाने जोरदार सिंह गर्जना केली आणि आपला उजवा पाय भर दरबारात दाणकन जमिनीवर आपटला. त्या प्रचंड आवेशाने आणि आवाजाने दचकून सर्व राक्षस त्याच्याकडे विस्मयाने बघत राहिले. अंगद सर्वांना आव्हान देत म्हणाला,

'रावणा, तुझा विनाशकाळ जवळ आला आहे. म्हणूनच तुला दुर्बुद्धी सुचत आहे. मला ठार मारणे तर दूरच, पण मी जमिनीवर ठेवलेला माझा उजवा पाय जर कोणी तसू भर जरी हलवला तरी श्रीराम तो त्यांचा पराभव समजून देवी सीतेविना लंकेच्या दारातून परत फिरतील.'

असंख्य राक्षस, अंगदाचा पाय हलवण्यासाठी त्याच्या पायाशी झटा देऊ लागले. पण त्याच्यावर कुठल्याच बळाचा परिणाम होईना. अखेर ते त्याच्यावर शस्त्रांनी प्रहार करू लागताच त्यांना चिलटाप्रमाणे झटकून तो उड्डाण करून श्रीरामांच्या समोर परत आला.

कथासार

कोणत्याही राजाचे दुसऱ्या राजाशी असलेले संबंध त्याच्या दूतांवर अवलंबून असतात. आदर्श दूत आपल्या राजाचे हित सर्व प्रकारे जपत असतो. सुग्रीवाचा दूत म्हणून हनुमानाने श्रीरामांचे मन जिंकून त्यांना सुग्रीवाशी मैत्री करण्यास प्रवृत्त केले आणि श्रीरामांचा दूत म्हणून सीतेला धीर दिला, सांत्वना दिली आणि श्रीराम तिच्या मुक्ततेसाठी येत असल्याचा विश्वास दिला. रावणाचे प्रचंड नुकसान करून, त्याची माणसे ठार करून रावणाच्या आणि समस्त राक्षसांच्या मनोधैर्यावर आघात केला. त्यांचा आत्मविश्वास डळमळीत केला. विभीषणासारखा महत्त्वाचा मोहरा स्वपक्षाकडे वळवून घेतला. अंगदाने प्रचंड आत्मविश्वासाचे प्रदर्शन करून श्रीरामांचा त्याच्यावरील विश्वास आणि त्याच्या म्हणजेच वानर सेनेच्या श्रीरामांवरील निष्ठेची खात्री पटवली. तसेच अत्यंत नाजूक अशा कौटुंबिक बाबीमध्ये सुद्धा हनुमानाने अत्यंत चतुरपणे आणि बुद्धीने भरताच्या सच्चेपणाची आणि निष्ठेची परीक्षा केली. राजाचे अर्धे यश यशस्वी दूतांवर अवलंबून असते.

आता राजे नाहीत. पण आपण अनेक ठिकाणी अनेकांचे प्रतिनिधी म्हणून जात असतो. वर्गाचा प्रतिनिधी असो, शाळेचा प्रतिनिधी असो, वस्तीचे प्रतिनिधी असो किंवा कुटुंबाचे प्रतिनिधी असो हे लक्षात ठेवणे अत्यंत आवश्यक आहे की प्रतिनिधी म्हणजे एक प्रकारे

दूतच. प्रतिनिधीचे वागणे बोलणे प्रतिपक्षावर अनुकूल किंवा प्रतिकूल परिणाम करीतच असते. तेव्हा आपल्या वागण्याबोलण्याने स्वपक्षाची हानी आणि प्रतिपक्षाचा फायदा होता कामा नये. प्रतिपक्षाला कधीही कमी लेखून बेसावध राहू नये. प्रतिपक्षाशी वागता बोलताना संपूर्ण आत्मविश्वासाने वागले, बोलले पाहिजे. प्रतिपक्षाची संपूर्ण माहिती मिळविण्याचा प्रयत्न केला पाहिजे. अशी सर्व दक्षता घेणे अत्यंत गरजेचे आहे. ह्या गुणांची नीट काळजीपूर्वक जोपासना केली तर विजय अशक्य नाही. मग खेळांचे सामने असोत की वक्तृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धा किंवा चित्रकला स्पर्धा. कुठल्या वाटाघाटी असोत की स्वतःची किंवा वर्गाची बाजू मुख्याध्यापकांकडे मांडणे असो, वरील उदाहरणे सतत तुम्हाला मार्गदर्शक ठरतील, जर त्यातले मर्म समजून घेतलेत तर.

१०. सत्यनिष्ठेचा आदर्श : **बिभीषण**

पुलस्त्य कुलातील आपला पिता विश्रवा मुनींकडून बिभीषणाला वेदांचे ज्ञान झाले होते. तसेच ते रावणाला व कुंभकर्णाला पण झाले होते. घोर तपश्चर्या करून बिभीषणाने ब्रह्मदेवांकडून वर मिळवले होते. त्याचप्रमाणे रावण व कुंभकर्ण दोघांनी मिळवले होते. पण त्या दोघांचे हेतू दुष्ट आणि वृत्ती पाशवी होती. बिभीषणाला विद्येचा आणि वराचा उपयोग स्वतःची उन्नती करण्यासाठी करायचा होता तर रावण -कुंभकर्णांना जग जिंकण्यासाठी, लुटण्यासाठी, स्वतःसाठी उपभोग मिळवण्यासाठी करायचाहोता.

शूर्पणखा रावणाकडे श्रीरामांची तक्रार घेऊन आली तेव्हा घडलेला प्रकार ऐकून आणि आपल्या बहिणीची अवस्था पाहून रावण खवळून उठला. तो श्रीरामांचा वध करण्यास निघाला. तेव्हा अकंपन नावाचा त्याचा एक मंत्री त्याला म्हणाला-

'महाराज, राम एवढा कुशल योद्धा आहे की त्याचा युद्धात कोणी पराभव करू शकणार नाही. त्याचा भाऊ लक्ष्मण सुद्धा तसाच पराक्रमी आहे. म्हणून शूर्पणखेने वर्णन केलेली ती त्रिभुवन सुंदरी, श्रीरामांची पत्नी सीता हिचे युक्तीने अपहरण करा. म्हणजे तिच्या वियोगाच्या दुःखाने राम आपोआप मरून जाईल.'

बिभीषणाने असा सल्ला देण्यापासून अकंपनाला रोखण्याचा प्रयत्न केला, पण खुद्द रावणाला तो सल्ला फारच आवडला. त्या बदसल्ल्याप्रमाणे त्याने सीतेला मारीच राक्षसाच्या मदतीने कपट करून पळवून आणून लंकेत ठेवले. रावणाचे एक एक पापकर्म आणि अन्याय्य वर्तन पाहून बिभीषण अतिशय कष्टी झाला होता. त्याचा सामोपचाराचा कुठलाच सल्ला रावणाला कधीच मानवत नसे. सीतेला पळवून आणून रावणाने आपल्या पापकर्मांवर कडीच केली होती. हे कृत्य पाहून बिभीषण विटून गेला. राक्षसांचे हेर श्रीरामांसंबंधी ज्या बातम्या आणत त्या ऐकून ऐकून त्याच्या मनात श्रीरामांविषयी स्नेह निर्माण होऊ लागला होता. तो आधीच सात्विक वृत्तीचा विष्णुभक्त होता. त्याला या सर्व प्रकरणात लंकेच्या नाशाची बीजे दिसू लागली. मनातून तो फारच अस्वस्थ झाला होता. हनुमानाची आणि त्याची भेट झाल्यानंतर त्याच्या मनाला शांती प्राप्त झाली. अशांती आणि अराजकाच्या या काळात त्याला आशेची किरणे दिसू लागली.

हनुमानाला बंदी करून इंद्रजिताने सभेत आणले तेव्हा बिभीषण तेथेच होता. हनुमानाचे सडेतोड भाषण ऐकून रावणाला त्याचा राग आला. त्याने हनुमानाला मारून टाकण्यास सांगितले. त्याचे ते आततायी कृत्य पाहून बिभीषण त्याला म्हणाला-

'लंकाधिपती, आपला राग सोडून देऊन मी जे सांगतो आहे ते ऐक. दूताचा वध करीत नाहीत. तसे करणे धर्माच्या विरूद्ध आहे. लोकव्यवहारात निंद्य आहे. तुझ्यासारख्या श्रेष्ठ वीराला शोभादायक नाही. आपले कर्तव्य करीत असताना प्रमाद घडला तर दूताला न मारता त्याचे अवयव तोडणे, चाबकाने मारणे वा मुंडन करणे अशा प्रकारच्या शिक्षांचा पर्याय सांगितला आहे.'

'तर मग ज्या शेपटाचा वानरांना मोठा गर्व असतो, ते ह्याचे शेपूटच जाळून टाका.'

हनुमानाचे शेपूट पेटवताच त्याने सारी लंका भस्म करून टाकली. सर्वत्र हाहाःकार उडवून दिला.

श्रीराम वानरसैन्यासह लंकेकडे निघाल्याची वार्ता दूतांकडून कळताच रावणाने सभा बोलावली.

'एकट्या हनुमानाने लंका पेटवली आणि पुष्कळ राक्षस मारले. आता वानरांचे सारे सैन्यच लंकेवर चालून येत आहे. तर आता मी काय करावे मला सांगा.'

राजा सत्वशील असला तर त्याचे सल्लागार सुद्धा सत्याने चालणार आणि धर्माप्रमाणे सल्ला देणारे असतात. अन्यायी राजांचे सल्लागार सुद्धा त्याला अन्यायाला प्रवृत्त करणारेच असतात. त्यांनी रावणाची वारेमाप स्तुती केली, आणि ते म्हणाले,

'तुला काळजी करण्याचे काहीच कारण नाही. तुझा पराक्रम जगात अद्वितीय आहे तू इंद्राचा आणि प्रत्यक्ष मृत्यूचा युद्धात पराभव केला आहेस. हे क्षुल्लक संकट मनावर घेण्याचे काहीच कारण नाही. तू सहजच रामाला ठार मारशील.'

नंतर राक्षसांनी एकापेक्षा एक बढाया मारण्यास सुरूवात केली. सारे जण वानर सैन्याची सहजी चटणी उडवून देण्याच्या वल्गना करू लागले. हा सर्व प्रकार बिभीषणाला असह्य झाला. तो नम्रपणे हात जोडून रावणासमोर जाऊन म्हणाला-

'राम आणि वानरसैन्याला या प्रकारे कमी लेखणे योग्य होणार नाही. शत्रूच्या शक्तीचा योग्य अंदाज न घेता स्वतःच्याच मस्तीत चूर राहणे हे नाशाला आमंत्रण ठरते. योग्य मार्ग म्हणजे रामाची सीता त्याला परत करणे हाच आहे. धर्माचा आदर करून धर्म आचरणारे राम युद्धात अजेय आहेत. त्यांच्या बरोबर अधर्माने लढणे शक्य नाही. रावणा, तुझा भाऊ म्हणून मी तुला सल्ला देतो की अधर्म सोडून दे. धर्माप्रमाणे वाग व सीता रामाला परत देऊन टाक.'

दुसऱ्या दिवशी सकाळी बिभीषणाने परत रावणाची भेट घेतली तो त्याला म्हणाला-

'सीतेला येथे आपल्यापासून मला सतत अशुभ सूचक चिन्हे दिसत आहेत. रावणा, माझ्या सांगण्याप्रमाणे सीता रामाला देऊन टाकणे हेच सर्वांसाठी हितकारक आहे.'

'मला कशाचीच भीती वाटत नाही. सगळे देव जरी रामाच्या मदतीला आले तरी राम माझ्यासमोर पाला पाचोळा आहे.'

नंतर राजसभेमध्ये सुद्धा रावणाने सीतेला कोणत्याही परिस्थितीत परत न करता श्रीरामांना ठार करण्याची वल्गना केली.

बिभीषण म्हणाला-

'रामापुढे तुमचे कोणाचेच काही चालणार नाही. वानरसैन्य लंकेवर चालून आले नाही तोपर्यंत रामाला सीता देऊन टाकणे हेच चांगले. एक चांगला मंत्री म्हणून मी हाच सल्ला राजाला देणे उचित समजतो.'

बिभीषणाचे भाषण ऐकून इंद्रजित संतापला. तो म्हणाला-

'या सभेमध्ये सर्वात भेकड आणि नामर्द असा एकच आहे आणि तो म्हणजे बिभीषणा, तू! आमच्यातील अत्यंत दुर्बलातील दुर्बल राक्षस सुद्धा रामलक्ष्मणाची हत्या सहज करू शकेल. तुला भयगंडाने पछाडले आहे.' 'इंद्रजिता, मोठ्यांशी कसे बोलावे हे तुला समजत नाही. तू अजून लहान आहेस. सल्ला देण्याची योग्यता अजून तुला मिळायची आहे.'

आपल्या मुलाला त्याने असे बोलताच रावण बिभीषणावर चिडला. 'बिभीषणा, माझा उत्कर्ष आणि माझे ऐश्वर्य तुझ्या नजरेत सलते आहे. एकमेकांच्या विपत्तीत आनंद मानणारे भाऊबंद धोकादायक असतात. दुसरा कोणी असे बोलला असता तर त्याने दुसरा क्षण बघितला नसता. मी तुझा धिक्कार करतो.'

रावणाचे ऐकून सारेच राक्षस बिभीषणावर शिव्यांची बरसात करू लागले. या पुढे लंकेत राहणे धोक्याचे असल्याचे पाहून तो श्रीरामांच्या आश्रयाला निघाला.

सेतू बंधनाचे काम चालू असलेल्या ठिकाणी येऊन तो सुग्रीवाला म्हणाला,-

'मी रावणाला धर्माने आचरण करण्याचा आणि सीतेला रामाकडे परत पाठवायचा सल्ला दिला म्हणून रावणाने माझा अपमान केला. गोड बोलणारे पुष्कळ मिळतात, परंतु कटू असले तरी हितकर बोलणारे आणि ऐकणारे दुर्लभ असतात. ज्यांचे आयुष्य संपले आहे असे पुरुष आप्तांचा हितकारक सल्ला ऐकून घेत नाहीत. म्हणूनच मी राज्य, बायको व मुलाचा त्याग करून श्रीरामाच्या आश्रयाला आलो आहे.'

सुग्रीव बिभीषणाला आश्रय देण्याच्या विरूद्ध होता. पण श्रीरामांनी हनुमानाला सल्ला विचारला. तो म्हणाला-

'मला प्रामाणिकपणे जे वाटते ते सांगतो. बिभीषणाविषयी मला अजिबात शंका येत नाही. त्याच्या ठिकाणी मला दुष्टपणा दिसत नाही. त्याला आपल्याकडे ठेवून घ्यावे.'

तो सल्ला ऐकून श्रीरामांनी बिभीषणाला अभय देऊन ठेवून घेतले. बिभीषणाने श्रीरामांना अतिशय अनमोल मदत करून विजयाचा मार्ग मोकळा करून दिला. श्रीरामांच्या अमोघ बाणांनी रावणाचा वध झाला. महाबलाढ्य रावण मरून धुळीत पडला. रावणाला तसा पडलेला पाहून बिभीषणाला अतोनात शोक झाला. अखेर तो त्याचा भाऊ होता. तो रडत म्हणू लागला.

'अरे महापराक्रमी वीरा, तू युद्धात मोठे जय मिळवलेस. मोठमोठ्या मौल्यवान मंचकावर आजपर्यंत झोपत आलास. पण अधर्माचा रस्ता सोडून धर्माने चालण्याचा माझा सल्ला तू मानला नाहीस. त्याचे तुला आज फळ मिळाले. आज तू असा धुळीत लोळत पडला आहेस.'

कथासार

कधी कधी अवघड निर्णय घ्यायची वेळ येते. एका बाजूला आपले रक्ताचे नातेवाईक, त्यांचा स्वार्थ आणि दुसऱ्या बाजूला जीवनभर पाळलेल्या निष्ठा यांची निवड करावयाची असते. पहिल्या बाजूला सुख जास्त असते. (म्हणजे तत्कालिक सुख) आणि दुसऱ्या बाजूला त्रास आणि दुःख यांची खात्री असते. सुख पुढे कधीतरी मिळणार असते. आत्मसन्मान आणि कीर्ती मिळणार असते. पहिल्या बाजूला जाण्याचा निर्णय घेतला तर 'आपले' म्हणवले जाणारे खुश होतात. पण दुसऱ्या बाजूला जाण्याचा निर्णय त्यांना कदाचित त्रास उत्पन्न करणारा असल्यामुळे ते नाराज असतात. अशीच वेळ जेव्हा बिभीषणावर आली, तेव्हा सर्व सुखे, बायको, मुले यांचा त्याग करून सुद्धा धर्माचा पक्ष घेणेच त्याने पसंत केले. त्याच्या घरच्यांनी त्याला फितूर ठरवले. (काही विद्वान पण रावणाच्याच मताचे आहेत.) पण सर्व निंदा सहन करून त्याने धर्माचा व सत्याचाच पक्ष घेतला. रावणाचे राज्य बळकावण्याचा त्याचा हेतू नव्हता. रावण वधानंतर त्याने केलेल्या शोकावरून हे कळतेच.

जेव्हा जेव्हा आपल्या आयुष्यात सत्य, असत्य, योग्य, अयोग्य किंवा धर्म, अधर्म यातील कोणती बाजू निवडावी असा प्रश्न उभा राहील तेव्हा बिभीषणाची आठवण जरूर ठेवा. कदाचित त्यावेळी तुम्ही टीकेचे लक्ष्य ठराल. पण शेवटी तुम्हीच बरोबर असल्याचे सिद्ध होईल. हो, पण त्रास होईल तो न डगमगता सहन केला तरच अंतिम विजयाची मजा घेता येईल. जेथे सत्य तेथे परमेश्वर आणि जेथे परमेश्वर तेथे विजय निश्चित असतो.

११. श्रीराम गुण दर्शन - आदर्शांचा आदर्श : **श्रीराम**



या पवित्र भूमीवर परमेश्वराची असीम कृपा म्हणून या देशाच्या मातीत असे दोन अलौकिक पुरुष जन्मले की ज्यांचे चरित्र बघितल्यानंतर माणूस थक्क होतो. या सर्व गुणांनी युक्त, अशा उत्तुंग कर्तृत्वाचा खरोखरच कोणी माणूस जन्मू शकतो यावर विश्वास बसू नये इतकी ही दोन व्यक्तिमत्वे थोर आणि उदात्त आहेत. तसे पाहता ही भूमी नररत्नांची खाणच आहे. पण या दोन विभूतींच्या थोरपणाला मानवी इतिहासात तोड नाही. हे दोनही पुरुष एवढे प्रचंड कर्तृत्व करून गेले की त्यांना सहजच लोकांनी देवत्त्व बहाल केले. हजारो वर्षे होऊन गेली तरी जनतेच्या मनावरची त्यांची मोहिनी कायम आहे. त्या दोन थोर विभूती म्हणजे वृष्णी कुळात जन्मलेले वसुदेव-देवकीचे सुपुत्र भगवान श्रीकृष्ण आणि इश्वाकू कुळात अयोध्या नृपती दशरथ व कौसल्या यांचे पोटी जन्मलेले प्रभू रामचंद्र!

श्रीराम विष्णूचा सातवा अवतार म्हणून मान्य झाले असले तरी महाकवी वाल्मीकिंच्या रामायणातील राम हा देवत्त्व पदाला पोहोचलेला मानवच आहे. रावण वधानंतर जेव्हा देव,

गंधर्व, यक्ष, किन्नर, राक्षस, वानर सारे श्रीरामांची स्तुती करू लागले, त्यांना 'तू प्रत्यक्ष भगवान आहेस असे म्हटले जाऊ लागले, तेव्हा श्रीराम सर्वांना थोपवून सांगतात, 'नाही, मी अयोध्यापती दशरथाचा ज्येष्ठ पुत्र राम, मानवच आहे.' श्रीरामांच्या सर्व भाव-भावना क्रिया-प्रतिक्रिया या संपूर्णपणे मानवी स्वभावाशी नैसर्गिकपणे जुळणाऱ्या आहेत. फक्त त्या पराकोटीच्या उदात्त आणि महान आहेत. 'श्रीमद् वाल्मिकी रामायणाचा' श्रीराम सर्वतोपरी आदर्श आहे. मनुष्याने जास्तीत जास्त किती चांगले वागावे याची सीमा दाखविणारा तो मर्यादा पुरुषोत्तम आहे. मनुष्य आपल्या कर्तृत्वाने देव कसा होऊ शकतो, याचे सर्वात उत्कृष्ट उदाहरण म्हणजे श्रीरामांचे चरित्र. श्रीरामांचे अनेक गुणविशेष आपण यापूर्वीच्या कथांमधून पाहिले. श्रीरामांच्या संपर्कातील अनेक उदात्त आणि आदर्श चरित्रे आपण पाहिली. पण सर्व गुणांचा आणि आदर्शाचा समुच्चय प्रभु रामचंद्र यांचे विविध गुण पुढील कथांमधून दिसून येतील. त्यांमधील किमान एक गुण जरी आपल्या अंगी बाणवू शकलो तरी आपले सारे जीवन उजळून निघेल.

१२. श्रीराम : आदर्श शिष्य

'राजा, माझ्या यज्ञाचे रक्षण करण्यासाठी तुझा ज्येष्ठ पुत्र श्रीराम तू मला दे. माझ्या यज्ञाचे रक्षण करण्यास केवळ तोच सर्वार्थाने सुयोग्य आहे.'

ब्रह्मर्षी विश्वामित्रांचे शब्द ऐकताच दशरथाचा थरकांप झाला. महर्षी धन किंवा गायी मागतील असे त्याला वाटले, पण त्यांनी मागितला त्यांचा सर्वात लाडका पुत्र. त्यांच्या तोंडून शब्द फुटेना. वचन पूर्ण करण्यास दशरथ कचरतो आहे असे पाहून विश्वामित्र संतापले आणि जाण्यास निघाले, हे पाहून राजगुरु वसिष्ठ, राजाला म्हणाले,

'राजन्, स्वतः विश्वामित्र अतिशय सामर्थ्यवान आहेत. सर्व शस्त्रं आणि अस्त्रांची त्यांना माहिती आहे. त्यांनी श्रीरामांना यज्ञरक्षणासाठी निवडले यात त्यांचा काही उदात्त हेतू असावा. तू कोणतीही शंका मनात न आणता रामाला त्यांच्यासोबत पाठवून दे.'

श्रीराम निघाल्यानंतर त्यांच्यावर प्राणापलीकडे प्रेम करणारा लक्ष्मण त्यांच्या मागोमाग

विश्वामित्राच्या आश्रमाकडे निघाला. वाटेने जाताना ते त्या दोन्ही राजकुमारांना निसर्गशोभा दाखवत वेगवेगळी माहिती सांगत जात होते. वाटेत त्यांना मलद आणि कारूष देश लागले. दोन्ही देश उजाड झाले होते. शेते, घरे उद्‌ध्वस्त झालेली, जागोजागी गुरांचे, माणसांचे सांगाडे पडलेले, उदास, भयाण असे ते देश पाहून श्रीरामांनी विश्वामित्रांना असे होण्याचे कारण विचारले. त्यांनी सांगितले,

'रामा, अति बलाढ्य सुंद राक्षसाची पत्नी आणि मारिचाची माता त्राटिका ही महाभयंकर राक्षसी या प्रदेशात राहत आहे. ती अत्यंत दुष्ट, क्रूर आणि भयंकर आहे. या देशांची अशी अवस्था तिनेच केली आहे.'

विश्वामित्र असे सांगत असतानाच कर्कश आवाजात गर्जना करीत आसमंतात धूळ आणि दुर्गंधीचे भपकारे उडवीत त्राटिका त्यांच्यावर धावून आली. विश्वामित्राने श्रीरामांना वध करण्यास सांगितले. परंतु श्रीरामांनी त्राटिका स्त्री असल्याने अवध्य असल्याची शंका काढताच विश्वामित्र म्हणाले,-

'त्राटिका, या प्रदेशांची आणि प्रजेची नासाडी करीत आहे. प्रजेचे रक्षण करणाऱ्यांनी त्यासाठी प्रसंगी स्त्रीची हत्या केली तरी त्यात अधर्म काहीच नाही. याच कारणासाठी इंद्राने विरोचनाची मुलगी मंथरा आणि विष्णूने इंद्राच्या नाशाचा प्रयत्न करणारी शुक्राचार्यांची माता यांचा वध केला होता. तू निर्धास्त हो आणि प्रजेला त्राटिकेच्या त्रासातून मुक्त कर.'

श्रीरामांनी त्राटिकेशी युद्ध केले आणि शेवटी आपल्या एका अमोघ बाणाने तिचा वध केला. त्राटिकेचा वध झालेला पाहून विश्वामित्र अत्यंत प्रसन्न झाले. त्यांनी त्यानंतर श्रीरामांना अनेक विद्या आणि शस्त्रे शिकविली. सर्व प्रथम त्यांनी त्यांना बला आणि अतिबला या विद्या शिकवल्या. त्या विद्यांच्या मुळे श्रीराम तहान, भूक, प्रवासाचा शीण, थकवा यापासून मुक्त तर झालेच पण रणांगणात अवध्य झाले. श्रीरामांची ग्रहणशक्ती आणि शिक्षण घेण्याची आवड पाहून विश्वामित्र त्यांना नवनवी अस्त्रे आणि शक्ती शिकवू लागले. त्याचप्रमाणे अस्त्रांच्या उपशमनाचे मंत्रदेखील शिकवू लागले. विश्वामित्रांनी त्यांच्याकडील सारी शस्त्रास्त्र विद्या सर्व मंत्रांसह श्रीराम व लक्ष्मणास शिकवली. या विद्यांच्या उपायांनीच श्रीरामांनी सुबाहूचा वध केला आणि मारीचाला समुद्रापार पिटाळून लावले. विश्वामित्रांचा यज्ञ यशस्वीपणे संपूर्ण झाला.

कथासार

श्रीरामांनी आश्रमात राहून गुरुची वा गुरुपत्नीची सेवा करून लाकडे व पाणी वाहून गुरुस प्रसन्न करू घेतले नाही तरी आपली ज्ञान लालसा प्रगट करून आणि ज्ञान घेण्याची आपली पात्रता सिद्ध करून विश्वामित्रासारख्या अत्यंत कठोर व कोपिष्ट ऋषींची कृपा मिळवली आणि अत्यंत दुर्लभ व मौल्यवान ज्ञान त्यांच्या कडून प्राप्त करून घेतले. श्रीरामांचा हा आदर्श मानून आपण आपल्या शिक्षकांना प्रसन्न करून घेण्याचा प्रयत्न का करू शकणार नाही? मग ज्ञानसंपन्न होणे अशक्य नाही. केवळ ज्ञानाच्या जोरावर गरीब नावाड्याचा एक मुलगा आपल्या खंडप्राय देशाचा राष्ट्रपती होऊ शकतो हे आपण पाहिलेच आहे.

१३. श्रीराम : **आदर्श बंधू**

एका प्रसन्न सकाळी श्रीराम व सीता चित्रकूट पर्वताच्या एका शिळेवर बसून आजूबाजूंची वनशोभा पाहात होते. निसर्ग पूर्ण भराने फुलला होता. आल्हाददायक सुगंधित असा मंद मंद वारा सुटलेला होता. श्रीराम जानकीला निरनिराळी दृष्ये दाखवीत होते. दोघांचा हास्यविनोद सुरू होता. लक्ष्मण सावध नजरेने आजुबाजूला पाहात काही अंतर राखून मागील बाजूस थोड्या अधिक उंचीवर उभा होता. एवढ्यात त्याच्या डोक्यावरून भयभीत होऊन वाकडातिकडा उडत जाणारा पक्षांचा एक भला मोठा थवा त्याला दिसला. तो अधिकच सावधपणे निरीक्षण करू लागला. काही वेळातच चित्रकूट पर्वताच्या दिशेने येणाऱ्या वाटेवर धुळीचे लोट उठताना त्याला दिसले. त्याने जोरात हाक मारून श्रीराम जानकीस सावध केले आणि तो झपाट्याने एका उंच झाडावर चढून गेला. तेथून तो ओरडला- ‘रामा, एक चतुरंग सेना या दिशेने येत

आहे. आता मला त्यांचे ध्वज आणि पताका सुद्धा स्पष्ट दिसत आहेत. एका अलंकृत हत्तीवर अयोध्येचा ध्वज सर्वात अग्रभागी असलेला मला दिसत आहे. रामा, आपला समूळ नाश करण्यासाठी भरत प्रचंड सैन्य घेऊन येत आहे. सावध! रामा, सावध!!

झाडावरून झरझर खाली उतरून लक्ष्मण रामाच्या जवळ आला आणि सांगू लागला-

'रामा, सीतेला पलीकडल्या गुहेत सुरक्षित लपण्यास सांग, तू तेथेच राहून तिचे रक्षण कर. भरताच्या सर्व सैन्याला रोखण्यासाठी मी समर्थ आहे. केवळ सैन्यच नव्हे तर खुद्द भरताला सुद्धा ह्या लक्ष्मणाच्या बाणांचा प्रताप पाहू दे. जा लवकर, सीतेला घेऊन ताबडतोब गुहेचा आसरा घे.

'अरे लक्ष्मणा, असा रागाने उतावळा होऊ नकोस. मामाच्या घरून परत आलेला भरत मुद्दाम आपल्याला भेटण्यासाठी येत आहे त्याच्या मनात कपट किंवा दुष्टभाव नाही. तू निश्चिंत रहा.'

'रामा, याच भरतामुळे तू राज्याला मुकलास. भरत आपला शत्रू आहे. त्याच वध करण्यात मला काहीच दोष दिसत नाही.'

अत्यंत भावनाविवश होऊन आणि सात्विक संतापाने पेटून निघून लक्ष्मण भरताच्या विरूद्ध बोलत असला तरी श्रीराम भरताचे अंतरंग ओळखत होते. लक्ष्मणाच्या खांद्यावर आपल्या हाताने थोपटत त्याला शांत करीत ते म्हणले-

'लक्ष्मणा, असा तापटपणा बरा नव्हे. हा तुझा तापटपणा कधी तरी घात करील. अरे, अत्यंत दुःखी होऊन भरत आपल्याला भेटायला येत आहे. तू जर अशी राज्याची भाषा बोलत असलास तर मी भरताला सांगतो की अयोध्येचे राज्य लक्ष्मणाला देऊन टाक. बघच तू, माझे शब्द पूर्ण होण्याच्या आत भरत तुला राज्य देऊन मोकळा होईल.'

श्रीरामांचे शब्द ऐकून लक्ष्मण अत्यंत खजील झाला.

गर्दीत हरवलेल्या लेकराला आई दिसावी तसा धावत येऊन भरत श्रीरामांना बिलगला. भरत वारंवार रामाला परत चलण्याचा आग्रह करू लागला. पण श्रीरामांनी आपल्या प्रतिज्ञेपासून ढळण्यास नकार दिला. भरताने अखेर तेथेच वनवासात राहण्याचा हट्ट धरताच त्याला राजाशिवाय राज्यात कसे अराजक माजेल हे समजावून सांगितले. मानवी जीवनाचे सारे सार उलगडून सांगितले. भरताच्या इच्छेप्रमाणे सिंहासनावर ठेवण्यास आपल्या पादुका देऊन श्रीरामांनी भरताला निरोप दिला.

कथासार

श्रीराम आपल्या भावांचे स्वभाव, त्यांचे अंतरंग पूर्णपणे जाणत असत. धाकट्या भावंडांवर आईप्रमाणे माया करीत असत. म्हणूनच त्यांचे भाऊ सुद्धा त्यांच्या शब्दासाठी स्वतःचा जीव ओवाळून टाकण्यास सज्ज होते आणि हातात आलेले साम्राज्य गवताच्या काडीप्रमाणे तुच्छ मानून ठोकरून देत होते.

आपण जेव्हा दुसऱ्यांवर प्रेम करतो, त्यांच्या पोटात शिरून त्यांना आपलेसे करून घेतो, तेव्हाच इतर आपल्यावर प्रेम करतात. आपल्यासाठी झटतात. आपण श्रीरामांसारखे आपल्या भावंडांवर प्रेम करू शकणार नाही का? त्यांना समजून घेऊ शकणार नाही का? श्रीरामांच्या उत्कटतेने नाही तरी त्यांच्या थोड्या प्रमाणात तरी ते सहज शक्य होईल. अरे, परंतु श्रीराम सुद्धा मानवच होते की! आपण सुद्धा तर माणसेच आहोत. आपण पण आदर्श भाऊ किंवा बहीण होणे कठीण वाटले तरी अशक्य निश्चितच नाही.

१४. श्रीराम : आदर्श पती

श्रीराम व जानकीचा विवाह समारंभ आटोपून लग्नाची वरात अयोध्येला परत आली होती. गेले ८ ते १० दिवस नगरात नुसता उत्सव चालू होता. चारही राजकुमारांचा विवाह एकदमच पार पडल्यामुळे असा उत्सव आता अनेक वर्षे होणार नव्हता. अयोध्येची सारी प्रजा रोज सकाळ संध्याकाळ राजाचे पाहुणे म्हणूनच जेवत होती. आजच सर्व शांत झाले होते. सर्वांना निवांतपणा मिळाला होता. श्रीराम व जानकी महालात निवांत बसले होते. प्रथेप्रमाणे श्रीराम काही भेटवस्तू उपहार देतील म्हणून जानकी उत्सुकतेने त्यांच्याकडे पहात होती. श्रीरामांनी अत्यंत सुंदर नवलखा हार जानकीच्या गळ्यात घातला. गळ्यातला हार जानकी डोळे भरभरून आरशात न्याहाळत होती. आनंदाने तिचा चेहरा चंद्राप्रमाणे फुलला होता.

'ह्या हारापेक्षा सुद्धा एका मौल्यवान गोष्ट जानकी मी तुला देणार आहे. अशी गोष्ट, जी इश्वाकू वंशातच काय परंतु कोणत्याही राजाने आपल्या राणीला आजपर्यंत दिली नसेल.'

जानकीच्या चेहऱ्यावर उत्सुकता पसरली. आता तिला तो सुंदर हार सुद्धा तितकासा चांगला वाटेनासा झाला. सर्व प्राण डोळ्यांत आणून ती श्रीराम आता काय देणार आहेत याची वाट पाहू लागली. श्रीराम आसनावरून उठून खिडकी जवळ गेले. 'जानकी, रोहिणी सह चंद्राला साक्षी ठेवून, अरूंधतीसह आकाशात विराजणाऱ्या सप्तर्षींना साक्षी ठेवून, सर्व देव, नक्षत्र, दिक्पाल, अष्टवसू, मरुत्गण आणि माझ्या महान कुळातील माझ्या सर्व तेजस्वी महापुरुषांना स्मरून हा दशरथनंदन राम आज तुला वचन देतो आहे. रामाच्या जीवनात जनकनंदिनी सीतेशिवाय दुसरी कोणतीही स्त्री येणार नाही. एकवेळ पर्वत आपली जागा सोडतील, तारे मार्ग बदलतील पण राम आपली प्रतिज्ञा मोडणार नाही.

अमृतासारखे हे शब्द कानी पडताच जानकीला साऱ्या जगातील सोने चांदी इ. चे वैभव तुच्छ वाटू लागले. आता ती एका आदर्श राजाची तितकीच आदर्श राणी होणार होती. श्रीराम ांनी आपली ही प्रतिज्ञा शब्दशः पाळली.

कांचन मृगाचे रूप घेतलेल्या मारीचाला मारून श्रीराम झपाट्याने कुटीकडे निघाले. मरताना मारीचाने त्यांचा आवाज काढून सीतेला आणि लक्ष्मणाला आर्त हाका मारल्यामुळे त्यांच्या मनात नाना शंका कुशंका येऊलागल्या. वाटेतच त्यांना घाईने येणारा लक्ष्मण भेटला.

'लक्ष्मणा, तुला मी स्पष्ट शब्दात सूचना केली होती की सीतेला एकटी सोडून तेथून हलू नकोस. या रानात श्वापदांचे भय तर आहेच, पण आजकाल, राक्षस सुद्धा आपल्या कुटी भोवती घिरट्या घालीत असतात हे तुला माहीत नाही का? त्यातल्याच कोणा राक्षसाने त्या कोमल असणाऱ्या सीतेस खाऊन टाकले तर? तू फार मोठी चूक केलीस.'

त्यांच्या चेहऱ्यावरची व्याकुळता आणि स्वरातील अधीरता लपत नव्हती. लक्ष्मणाचा राग येऊन सुद्धा ते अधिक काही न बोलता झपाट्याने कुटीकडे चालू लागले. जवळ-जवळ धावतच ते कुटीत पोहोचले. बघतात तर कुटी रिकामी.

'जानकी, जानकी'

हाकेला ओ नाही. त्यांनी आजूबाजूला, मागे परसदारात सगळीकडे घाबऱ्या घाबऱ्या शोधले. 'सीते, सीते, जानकी जानकी' अशा हाकांचा सपाटा सुरू केला. अंगणामधे सीतेच्या वेणीतील गळून पडलेली फुले, मोडून पडलेली फुलझाडे आणि वेली पाहताच श्रीरामांचा बांध फुटला.

'लक्ष्मणा, अरे माझी सीता कोठे गेली? अरे तिला कोणी पळविली की कोणा दुष्टाने तिला खाल्ले. सांग लक्ष्मणा, माझी सीता कोठे गेली? हे झाडांनो, हे वेलींनो, हे फुलांनो मला कोणी तरी सांगा, माझी जानकी कोठे आहे? हे वनदेवतांनो, माझ्या सीतेला तुम्ही पाहिले का?'

डोळ्यांतून अश्रू वहावत श्रीराम वेड्यासारखे हिंडू लागले. झाडांना, वृक्षांना मिठ्या मारू लागले. वेलींना फुलांना गोंजारू लागले. त्यांना आपल्या देहाची शुद्ध राहिली नाही की अंगावरच्या वल्कलांची. सीतेला हाका मारीत ते वनात हिंडू लागले. त्यांची शस्त्रे सांभाळत लक्ष्मण असहाय्यपणे मागेमाग जात राहिला. त्याच्याकडे श्रीरामांना सावरण्याचे ना धैर्य होते ना समजावण्यासाठी शब्द. आपल्या चुकीचा हा भयंकर परिणाम पाहून तो हतबुद्धच झाला होता. जिथे आदर्शाचा मूर्तिमंत पुतळा, संयमाचा महामेरू, धर्मज्ञानी महावीर स्वतः श्रीराम आपल्या प्राणप्रिय बायकोच्या विरहाने वेडेपिसे झाले होते. तेथे लक्ष्मणाची अवस्था काय विचारावी!

वाटेत मरणोन्मुख जटायू कडून रावणाने सीतेला पळवून नेल्याचे ऐकल्यावर थोडा त्यांच्या जिवात जीव आला. सीता जिवंत आहे हे कळताच त्यांना धीर आला. त्यानंतर सुरू झाली सीतेच्या शोधासाठी रानोमाळ वणवण. राने-वने, डोंगर-दऱ्या, तलाव-सरोवर अशी क्वचितच कुठली जागा असेल जिथे त्यांनी सीतेला शोधले नाही. कुठलेही सुंदर दृष्य दिसले, चांगली वस्तू दिसली, फुले, पक्षी, हरणे असे काही दिसले तरी श्रीराम सीतेच्या आठवणींनी व्याकुळ होत. सीतेच्या शोधासाठी त्यांनी वानरांचा राजा सुग्रीव याच्याशी मैत्री केली. त्याच्या भावाचा, वालीचा, वध करून त्याला राज्य परत मिळवून दिले आणि वानरांचे सहाय्य घेऊन हनुमाना करवी सीतेचा ठावठिकाणा शोधून काढला. समुद्रावर पूल बांधून लंकेत प्रवेश केला आणि सीतेला पळवणाऱ्या रावणाचा त्याच्या सर्व कुटुंब व कुळासह नायनाट करून त्यांनी सीतेला मुक्त केले.

कथासार

ज्या काळात पुरुषाने एकापेक्षा जास्त लग्ने करणे ही सर्वसामान्य गोष्ट होती आणि राजवाड्यात जास्तीत जास्त स्त्रिया बाळगणे हे राजांच्या प्रतिष्ठेचे मोजमाप मानले जाई, त्या काळात एकपत्नी व्रत घेणे आणि ते आजन्म निष्ठेने पाळणे हे अलौकिकच. तसेच बायकोवर इतके उत्कट आणि प्रगाढ प्रेम आज देखील दुर्मिळ आहे. पुढे श्रीरामांना सीतेचा त्याग करावा लागला तरी त्यांनी सारे आयुष्य तिच्या आठवणीवर काढले. यज्ञासाठी पत्नी जोडीला असणे आवश्यक होते म्हणून सीतेची सुवर्ण प्रतिमा शेजारी बसवली. पण दुसरा विवाह केला नाही.

मानवी जीवनातील एक सुद्धा गोष्ट अशी नाही की ज्यासाठी श्रीरामांकडे आदर्श म्हणून बोट दाखवता येणार नाही.

१५. श्रीराम : आदर्श शरणदाता



बिभीषणाने रावणाला सीतेस सोडून देऊन श्रीरामांकडे पाठविण्याचे परोपरीने पटवून देण्याचा प्रयत्न केला. अनेक तर्क सांगितले. धर्माचे, नीतीचे दाखले दिले. पण स्वतःच्या सामर्थ्याच्या मस्तीत मस्त असलेल्या रावणाने उलट त्याचाच अपमान केला. इंद्रजितासारख्या, वयाने लहान असणाऱ्यांनी पण, अत्यंत वाईट शब्द वापरून टीका केली. रावणाचे सारेच मंत्री बिभीषणावर उलटले. त्याला कुलद्रोही, देशद्रोही म्हणून शिव्या देऊ लागले. रावणाने त्याला हाकलून दिले. अशा परिस्थितीत लंकेत राहणे बिभीषणाला शक्य नव्हते. त्याला हनुमानाच्या भेटीत झालेले संभाषण आठवले. आपल्या मित्रांशी विचार-विनिमय करून त्याने श्रीरामांकडे जाण्याचा निश्चय केला. तो आकाशमार्गाने सेतुबंधनाचे काम चालू होते तेथे आला. आकाशामध्येच स्थिर राहून त्याने सुग्रीवाला हाक मारून सांगितले, 'लंकाधिपती रावणाचा मी धाकटा भाऊ. पुलस्त्य ऋषिकुलातील बिभीषण, अन्यायी आणि अधर्माने चालणाऱ्या माझ्या भावाचा आणि माझ्या सर्व आप्तजनांचा, संपत्तीचा, राज्याचा त्याग करून धर्मरक्षणाच्या कार्यात सहभागी होण्यासाठी श्रीरामांना शरण आलो आहे. मला श्रीरामांकडे घेऊन चला.'

त्याला तसाच आकाशात ठेवून सुग्रीव श्रीरामांकडे धावला. राक्षसांच्या राक्षस वृत्तीचे

वर्णन करून बिभीषणाला थारा न देण्याचा सल्ला तो देऊ लागला. अन्य वानर सुद्धा रावणाच्या प्रत्यक्ष भावाला जवळ करण्याच्या संपूर्ण विरोधात होते. पण प्रत्यक्ष लंकेत जाऊन आणि बिभीषणाशी थेट संभाषण करून आलेल्या हनुमानाने मात्र बिभीषणाच्या सच्चेपणाची व सात्विकतेची भलावण करत त्याला आसरा देण्याची शिफारस केली. सर्वांचे म्हणणे ऐकून श्रीराम म्हणाले-

'मित्रत्त्वाच्या भावनेने आलेल्या बिभीषणाला मी दूर लोटू शकत नाही. त्याच्यात भले काही दोष असतीलही. म्हणून त्याचा त्याग करावा अशी माझ्या अंगात भिनलेली सज्जनता मला परवानगी देत नाही.'

तरी सुग्रीवाचे समाधान होईना. तो वारंवार बिभीषणाला दूर ठेवण्याचा आग्रह करू लागला. श्रीराम अत्यंत शांत पण दृढ शब्दात म्हणाले-

'वानरश्रेष्ठ सुग्रीवा, मी जर मनात आणले तर या पृथ्वीवरील सर्व पिशाच्चे, दानव, यक्ष आणि राक्षसांचा केवळ माझ्या नखांनी एका क्षणात नाश करू शकतो. माझा माझ्या सामर्थ्यावर पूर्ण विश्वास आहे. त्यामुळे जर कोणी हात जोडून पूर्ण श्रद्धेने, दीनभावाने मला शरण आला असेल तर त्याला आश्रय नाकारण्याचा हक्क मला माझा धर्म देत नाही. मग तो रावणाचा भाऊ असो की प्रत्यक्ष रावण. जा, बिभीषणाला घेऊन या.'

येताच बिभीषण श्रीरामांच्या चरणावर कोसळला. श्रीरामांनी अभय देऊन त्याला हृदयाशी धरले. समुद्राच्या पाण्याने लक्ष्मणाकरवी अभिषेक करून तिथेच त्याला लंकापती घोषित केले. बिभीषणाने पण युद्धात श्रीरामांना अनमोल सहाय्य केले. रावणवध झाल्यानंतर श्रीरामांनी लंकेचे सारे राज्य बिभीषणाकडे सोपवले.

कथासार

स्वतःच्या सामर्थ्यावर विश्वास हवा. स्वतःवर संपूर्ण विश्वास हवा. तेव्हाच खरोखरच मनापासून आणि मित्रभावाने कोणी शरण आला असेल, आश्रय मागत असेल, तर त्याला जवळ करता येईल. मदत करण्याची शक्ती असेल तरच मदतीचा हात द्या. पण एकदा मदतीचा शब्द दिल्यानंतर मग सर्व शक्ती पणाला लावून त्याला मदत करा, स्वतःचा कोणताही स्वार्थ न ठेवता मदत करा. सोन्याची लंका जिंकली. पण श्रीरामांनी सोबत नेली फक्त जानकी, ती सुद्धा त्यांचीच होती म्हणून.

हे आदर्श समोर आहेत म्हणूनच या देशाचे राज्यकर्ते बांगला देश निर्माण करून तो त्या देशवासीयांकडे सोपवून परत येऊ शकतात. जगाच्या इतिहासात फक्त याच देशात हे घडू शकते.

१६. श्रीराम : आदर्श मित्र



श्रीराम एका चक्रवर्ती सम्राटाचे राजकुमार होते. जरी वनवासी झाले असले तरी स्वतः एक राजा होते. नामधारी नव्हे तर अत्यंत समर्थ आणि सामर्थ्यवान. पण जेव्हा श्रीराम मित्रता करीत तेव्हा हातचे न राखता मित्रता करीत. आपण अनेक कथांमधून त्यांचे गुह, सुग्रीव, बिभीषण, हनुमान इ. बरोबर वागणे, बोलणे बघितले. त्यात त्यांची मित्राबद्दलची कळकळ स्पष्टच होते.

जटायूच्या मृत्यूनंतर त्यांनी त्याचा अंत्यविधी यथासांग मंत्रासहित केला. सुग्रीवाला प्रथम राज्य मिळवून दिले. नंतरच सीता शोधाची कामगिरी त्याच्यावर सोपवली. त्या कामात सुरुवातीला त्याने आळस केला तरी त्याला क्षमा केली. बिभीषणाला जवळ केल्यानंतर त्याच्यावर संपूर्ण विश्वास टाकला. वानर सैन्याला सक्त ताकीद दिली होती की श्रीराम, बिभीषण व त्याचे चार मंत्री असे केवळ सातजणच संपूर्ण युद्ध काळात मानव रूपात राहतील. कोणताही वानर कोणत्याही कारणासाठी संपूर्ण युद्ध काळात मानवरूपात येणार नाही.

किष्किंधेचे राज्य मिळाल्यानंतर काही महिन्यातच सुग्रीव श्रीरामांच्या कार्यात गुंतला.

त्याला राज्य कारभाराची घडी बसवता आली नव्हती. रावण वधानंतर बिभीषण लंकेचा राजा झाला. पण युद्धाने राक्षस कुळाचा आणि लंका नागरीचा संपूर्ण नाश झाला होता. हे सारे नीट मार्गी लावणे बिभीषणाचे प्रथम कर्तव्य होते. असे असताना सुद्धा आपली इतकी महत्त्वाची आणि तातडीची कामे सोडून ते दोन्ही राजे श्रीरामांबरोबर अयोध्येस आले. या सर्व कामांपेक्षा त्यांना श्रीराम राज्याभिषेक डोळ्यांनी पाहणे जास्त मोलाचे वाटले. ही एकच गोष्ट श्रीरामांनी मित्रांना किती प्रेम आणि विश्वास दिला असेल हे स्पष्ट करते.

कथासार

आपण आपले नातेवाईक निवडू शकत नाही. मित्र मात्र आपण निवडू शकतो. अशांशी मैत्री करावी की मैत्री केल्याचा पश्चात्ताप होणार नाही. एकदा मैत्री जोडली की स्वतःचा कुठलाही स्वार्थ मध्ये न आणता मित्रासाठी झटावे.

१७. श्रीराम : आदर्श सेनानी-योद्धा

श्रीरामांचे सारे आयुष्य संघर्षानी भरलेले आहे. ऐन किशोर वयात महर्षी विश्वामित्र यज्ञरक्षणासाठी त्यांना घेऊन गेले. जेव्हा त्राटिका त्यांच्या अंगावर धाऊन आली तेव्हा विश्वामित्रांनी तिचा वध करण्याची आज्ञा केली. पण स्त्री अवध्य असल्याने ते तिचा वध करण्यास कां कूं करू लागले. जेव्हा विश्वामित्रांनी धर्माचा हवाला दिला, इतिहासातील दाखले दिले आणि तिला मारणे जनहिताचे आहे हे पटवले तेव्हाच श्रीरामांनी त्राटिका वध केला. पण शूर्पणखा सीतेला खाण्यासाठी धावली तरी तिचा वध न करता केवळ नाक-कान कापून हाकलून दिले. कारण प्रश्न जनहिताचा नव्हे तर बायकोच्या सुरक्षिततेचा होता.

यज्ञ रक्षणाच्या समयी आणि दंडकारण्यात खर-दूषणा सह राक्षसांशी लढण्यात श्रीरामांच्या सहाय्याला केवळ एकटा लक्ष्मण होता. तरी त्यांनी आख्या राक्षस सैन्याचा पूर्ण निःपात केला. अनेक राक्षसांचा त्यांनी वध केला. पण कोणत्याही वेळी त्यांनी नीतीला सोडून युद्ध केले नाही.

काही लोकांचा समज आहे की वालीवर श्रीरामांनी झाडाआड दडून बाण सोडला. पण प्रत्यक्ष वाल्मीकि रामायण असे सांगते की श्रीरामांनी आपल्या धनुष्याचा टणत्कार करून

सर्व आसमंत दुमदुमून टाकला आणि समोरासमोर येऊन त्याच्या छातीत बाण मारला. रावणासारख्या देवांना जिंकणाऱ्या योध्याबरोबर श्रीराम समोरासमोर सामना देतात तर त्या पुढे वालीची काय कथा?

राम-रावण युद्धात लंकेतील सर्व राक्षस मारले गेले. क्रमाक्रमाने एक मोहरा पडत होता. पण वानर सेनेतील एकही महत्वाचा वीर वा सेनानी ठार झाला नाही. स्वतः श्रीराम व लक्ष्मण काही प्रसंगी गंभीर जखमी वा घायाळ झाले, पण एकाही वानर सेनानीला गंभीर दुखापत झाली नाही हा योगायोग वा दैवी चमत्कार नाही. तर श्रीरामांच्या कुशल व योजनाबद्ध युद्ध हालचालींचा परिणाम होता.'

श्रीरामांनी हाती शस्त्र घेतले. त्यांच्या हातून प्रचंड संहार झाला. पण त्यांनी स्वार्थासाठी, मजेसाठी, गंमत म्हणून किंवा कोणाला दुःख देण्यासाठी कधीही शस्त्र उगारले नाही. केवळ लोक-रक्षण, जनहित आणि खल निर्दालन याच हेतूने युद्ध केले. म्हणूनच एक योद्धा म्हणून किंवा सेनानी म्हणून श्रीराम आदर्श होत.

कथासार

ज्या श्रीरामांचे जवळपास अर्धे आयुष्य हातात शस्त्र घेऊन लढण्यात, झुंजण्यात गेले, त्या श्रीरामांना अहिंसा हे आपले जीवन-ध्येय, जीवन-मार्ग, जीवन-सर्वस्व मानणाऱ्या म. गांधीजींनी आपला आदर्श मानला. रामराज्याचे स्वप्न पाहिले. लोक रक्षणासाठी, देश रक्षणासाठी, दुष्टांना शासन करण्यासाठी केलेली हिंसा ही सुद्धा अहिंसाच. म्हणूनच त्या अहिंसेच्या पुजाऱ्याचा आदर्श, योद्धा शस्त्रधारी श्रीराम आहेत. कोणी साधू, संन्यासी वा तपस्वी नाही.



१८. श्रीराम : आदर्श राजा

अनुपमेय असे राम-रावण युद्ध संपले. बिभीषणाला लंकेचा राज्याभिषेक झाला. पण ज्यासाठी हा सारा खटाटोप केला तेच काम अजून शिल्लक होते. श्रीरामांच्या आज्ञेने हनुमान व बिभीषण जानकीकडे गेले. हनुमानाने सीतेला युद्धाची समग्र वार्ता व रावण वधाची सुवार्ता सांगितली. बिभीषणाने तिच्या अभ्यंग स्नानाची आणि प्रसाधनाची उत्कृष्ट सोय केली. विधिवत् स्नान करून सर्व सौभाग्य लेणी व अलंकार घालून व फुलांच्या माळा लेवून सीता बिभीषणाने पाठवलेल्या मेण्यात बसून रणभूमीवर श्रीरामांच्या समोर आली. काही वेळ दोघेही एकमेकांसमोर स्तब्ध उभे राहिले. नंतर अत्यंत शांत पण धीरगंभीर स्वरात श्रीराम सीतेला म्हणाले,

'जानकी, एक भयानक पर्व संपले आहे. मी माझ्यावरचा व रघुकुळावरचा कलंक धुऊन काढला आहे. तुझ्यासाठी युद्ध करून आज वानर जेते ठरले आहेत. सुग्रीवाला यश आले.

तुझ्यासाठी सागर ओलांडणारा हनुमान कृतार्थ झाला आहे. बिभीषणाला लंकेचे साम्राज्य मिळाले आहे. पण मैथिली, हे तुझ्यामुळे घडले. मी हे तुझ्यासाठी केले नाही तर हे करणे माझे कर्तव्य होत म्हणून केले. दुष्टाच्या तावडीतून तुझी सुटका केली. माझे कर्तव्य संपले. आता यापुढे आपला संबंध नाही. तू कोठेही जाण्यास मोकळी आहेस.'

पतीचे हे भयंकर शब्द ऐकताच वेल कोसळली तशी सीता कोसळली. जोर जोराने रडून शोक करू लागली. श्रीरामांची विनवणी करू लागली. पण श्रीराम काही सुद्धा न बोलता दगडाच्या मूर्तीसारखे अचल बसून होते. अखेर ती तेजस्वी स्त्री ताड्कन उठली.

'लक्ष्मणा, तुझ्या भावाने मला कोठेही जाण्याची मुभा दिली आहे. मला जाण्यास स्वर्गाशिवाय योग्य स्थान नाही. एका क्षणाचाही विलंब न करता ताबडतोब या इथेच लाकडाची चिता रचून अग्नी सिद्ध कर, मी सर्वांसमक्ष अग्नी प्रवेश करीन.'

सारी सेना सभोवती उभी होती. सर्वांवर शोककळा पसरली. सारे भरल्या डोळ्यांनी आणि गळ्यांनी श्रीरामांना समजावण्याचा प्रयत्न करू लागले. पण पाषाण मूर्तीच्या चेहऱ्यावरील रेष सुद्धा हलली नाही. लक्ष्मणाने चितेला अग्नी दिला. अग्नी भोवती व पती भोवती प्रदक्षिणा घालून ती पेटत्या चितेसमोर उभी राहिली. दोन्ही हात जोडून आकाशात बघत ती दृढ स्वरात म्हणाली,

'हे चराचरातील देवतांनो, आदित्यादि दिग्-पालांनो, तुम्ही सर्वांना साक्षी ठेवून माझ्या पावित्र्य रक्षणासाठी मी, अग्नीच्या स्वाधीन होत आहे. माझ्या पतीचे रक्षण करा.'

तिचे शब्द संपण्याच्या आत तिने चितेत उडी घेतली. लक्ष्मणाला भोवळ आली. सारी सेना हुंदके देऊ लागली, उसासे सोडू लागली आणि काही पळातच प्रत्यक्ष अग्निदेव चिता उध्वस्त करून प्रकट झाले. स्वतः हाताला धरून त्यांनी सीतेला श्रीरामांच्या स्वाधीन केले. ते म्हणले-

'रामा, जितका मी पावन आणि शुद्ध आहे. तितकीच ही सीता शुद्ध आणि पवित्र आहे. तू हिचा स्वीकार कर.'

श्रीरामांनी अग्निदेवास साष्टांग नमस्कार घालून म्हटले,-

'अग्निदेवा, आपली आज्ञा मला शिरसावंद्य आहे. सीतेच्या निष्ठेविषयी व पावित्र्याविषयी मला किंचितही शंका नव्हती. रामाच्या मनात सीता व सीतेच्या मनात रामाशिवाय दुसरे कोणी नाही याची आम्हा दोघांनाही खात्री आहे. पण देवा, मी राजा असलो तरी लोकनायक आहे. माझे नायकत्व लोकमान्यतेवर आधारलेले आहे. तीच माझी शक्ती आहे. लोकांच्या मनात

त्यांच्या राणी संबंधाने कोणतीही शंका राहू नये म्हणून मला असे वागावे लागले. मला क्षमा करा. जानकीचा आक्रोश पाहून मला धीर धरवत नव्हता, पण देवा, सभोवताली सारी सेना उभी असताना मी डोळ्यात पाणी कसे येऊ देऊ? माझे दुःख मी डोळ्यांतच गोठवले. देवा, माझी प्रजा हे माझे सर्वस्व आहे. तिच्या कल्याणाशिवाय मी दुसरा विचारच करू शकत नाही. या प्रजेचे नेते आसणारे आम्ही दोघेही सर्व शंका व संशयाच्या पलीकडे असावे हीच माझी निष्ठा आहे.'

कथासार

श्रीराम युवराज म्हणून आणि राजा म्हणून केवळ लोकांसाठीच जगत राहिले. लोकसेवेचे त्यांचे व्रत अखंड सुरू होते. ते स्वतःला लोकांच्या मर्जीचा गुलाम मानीत. ते वनवासाला निघताच अयोध्येची प्रजा त्यांच्या रथाच्या मागे निघाली आणि ते अवतार संपवून निजधामाला गेले तेव्हा त्यांच्या विरहाने बेभान झालेले हजारो अयोध्यावासी त्यांच्या मागेमाग शरयू नदीत विलीन झाले. राजा म्हणून त्यांना असलेल्या लोक मान्यतेचे हे ठळक उदाहरण आहे.

।। श्रीरामरक्षास्तोत्रम् ।।



श्रीगणेशाय नमः । अस्य श्रीरामरक्षास्तोत्रमन्त्रस्य बुधकौशिकऋषिः ।
श्रीसीतारामचंद्रोदेवता, अनुष्टुप् छन्दः । सीता शक्तिः
श्रीमदहनुमान् कीलकम्, श्रीरामचंद्रप्रीत्यर्थे जपे विनियोगः ।।

अथध्यानम्

ध्यायेदाजानुबाहुं धृतशरधनुषं बद्धपद्मासनस्थम्
पीतं वासो वसानं नवकमलदलस्पर्धिनेत्रं प्रसन्नम् ।
वामाङ्कारूढसीतामुखकमलमिललोचनं नीरदाभं
नानालमारदीप्तं दधत मुरूजटामण्डनं रामचंद्रम् ।।

इति ध्यानम् ।

चरितं रघुनाथस्य शतकोटिप्रविस्तरम्
एकैकमक्षरं पुंसां महापातकनाशनम् ।
ध्यात्वा नीलोत्पलश्यामं रामं राजीवलोचनम्
जानकीलक्ष्मणोपेतं जटामुकुटमण्डितम् ।
सासितूणधनुर्बाणपाणिं नक्तं चरान्तकम्
स्वलीलया जगत्त्रातुमाविर्भूतमजं विभुम् ।
रामरक्षां पठेत् प्राज्ञः पापघ्नीं सर्वकामदाम्
शिरो मे राघवः पातु भालं दशरथात्मजः ।
कौसल्येयो दृशौ पातु विश्वामित्रप्रियः श्रुती:
घ्राणं पातु मखत्राता मुखं सौमित्रिवत्सलः ।
जिव्हां विद्यानिधिः पातु कण्ठं भरतवन्दितः
स्कन्धौ दिव्यायुधः पातु भुजौ भग्नेशकार्मुकः ।
करौ सीतापतिः पातु हृदयं जामदग्न्यजित्
मध्यं पातु खरध्वंसी नाभिं जाम्बवदाश्रयः ।
सुग्रीवेशः कटी पातु सक्थिनी हनुमत्प्रभुः
उरू रघूत्तमः पातु रक्षः कुलविनाशकृत् ।
जानुनी सेतुकृत्पातु जङ्घे दशमुखान्तकः
पादौ विभीषणश्रीदः पातु रामो ऽ खिलं वपुः ।
एतां रामबलोपेतां रक्षां यः सुकृती पठेत्
स चिरायुः सुखी पुत्री विजयी विनयी भवेत् ।
पातालभूतलव्योमचारिणश्छद्मचारिणः

न द्रष्टुमपि शक्तास्ते रक्षितं रामनामाभिः ।
रामेति रामभद्रेति रामचन्द्रेति वा स्मरन्
नरो न लिप्यते पापैर्भुक्तिं मुक्तिं च विन्दति ।
जगज्जैत्रैकमंत्रेण रामनाम्नाभिरक्षितम्
यः कण्ठे धारयेत्तस्य करस्थाःसर्वसिद्धयः ।
वज्रपञ्जरनामेदं यो रामकवचं स्मरेत्
अव्याहताज्ञः सर्वत्र लभते जयमङ्लम् ।
आदिष्टवान् यथा स्वप्ने रामरक्षामिमां हरः
तथा लिखितवान् प्रातः प्रबुद्धो बुधकौशिकः ।
आरामः कल्पवृक्षाणां विरामः सकलापदाम्
अभिरामस्त्रिलोकानां रामः श्रीमान् स नः प्रभुः ।
तरुणौ रूपसम्पनौ सुकुमारौ महाबलौ
पुण्डरीकविशालाक्षौ चीरकृष्णाजिनाम्बरौ ।
फलमूलाशिनौ दान्तौ तापसौ ब्रह्मचारिणौ
पुत्रौ दशरथस्यैतौ भ्रातरौ रामलक्ष्मणौ ।
शरण्यौ सर्वसत्वांनां श्रेष्ठौ सर्वधनुष्मताम्
रक्षः कुलनिहन्तानौ त्रायेतां नो रघुत्तमौ ।
आत्तसज्ञधनुषाविषुस्पृशावक्षयाशुगनिषङगसङ्गिनौ
रक्षणाय मम रामलक्ष्मणावग्रतः पथि सदैव गच्छताम् ।
संन्नध्दः कवची खड्गी चापबाणधरो युवा
गच्छन् मनोरथोऽस्माकं रामः पातु सलक्ष्मणः ।
रामो दाशरथिः शूरो लक्ष्मणानुचरो बली
काकुत्स्थः पुरुषः पूर्ण कौसल्येयो रघूत्तमः ।
वेदान्तवेद्यो यज्ञेशः पुराणपुरुषोत्तमः
जानकीवल्लभः श्रीमानप्रमेयपराक्रमः ।
इत्येतानि जपेन्नित्यं मद्भक्तः श्रद्धायान्वितः
अश्वमेधाधिकं पुण्यं संप्राप्नोति न संशयः ।

रामं दूर्वादलश्यामं पद्माक्षं पीतवाससम्
स्तुवन्ति नामभिर्दिव्यैर्न ते संसारिणो नराः ।
रामं लक्ष्मणपूर्वजं रघुवरं सीतापतिं सुंदरम्
काकुत्स्थं करूणार्णवं गुणनिधिं विप्रप्रियं धार्मिकम् ।
राजेन्द्रं सत्यसन्धं दशरथतनयं श्यामलं शान्तमूर्तिम्
वन्दे लोकाभिरामं रघुकुलतिलकं राघवं रावणारिम् ।
रामाय रामभद्राय रामचंद्राय वेधसे
रघुनाथाय नाथाय सीतायाः पतये नमः ।
श्रीराम राम रघुनन्दन राम राम
श्रीराम राम भरताग्रज राम राम ।
श्रीराम राम रणकर्कश राम राम
श्रीराम राम शरणं भव राम राम ।
श्रीरामचंद्रचरणौ मनसा स्मरामि
श्रीरामचंद्रचरणौ वचसा गृणामि ।
श्रीरामचंद्रचरणौ शिरसा नमामि
श्रीरामचंद्रचरणौ शरणं प्रपद्ये ।
माता रामो मत्पिता रामचंद्रः
स्वामी रामो मत्सखा रामचंद्रः ।
सर्वस्वं मे रामचंद्रो दयालुर्
नान्यं जाने नैव जाने न जाने ।
दक्षिणे लक्ष्मणो यस्य वामे तु जनकात्मजा
पुरतो मारूतिर्यस्य तं वन्दे रघुनन्दम् ।
लोकाभिरामं रणरङ्धीरं राजीवनेत्रं रघुवंशनाथम्
कारूण्यरूपं करूणाकरं तं श्रीरामचंद्र शरणं प्रपद्ये ।
मनोजवं मारूततुल्यवेगं जितेंन्द्रियं बुद्धिमतां वरिष्ठम्
वातात्मजं वानरयूथमुख्यं श्रीरामदूतं शरणं प्रपद्ये ।
कूजन्तं रामरामेति मधुरं मधुराक्षरम्

आरूह्य कविताशाखां वन्दे वाल्मीकिकोकिलम् .
आपदामपहर्तारं दातारं सर्वसंपदाम्
लोकाभिरामं श्रीरामं भूयो भूयो नमाम्यहम् ।
भर्जनं भवबीजानामर्जनं सुखसंपदाम्
तर्जनं यमदूतानां रामरामेति गर्जनम् ।
रामो राजमणिः सदा विजयते रामं रमेशं भजे
रामेणाभिहता निशाचरचमू रामाय तस्मै नमः ।
रामान्नास्ति परायणं परतरं रामस्य दासोऽस्म्यहम्
रामे चित्तलयः सदा भवतु मे भो राम मामुद्धर ।
रामरामेति रामेति रमे रामे मनोरमे
सहस्त्रनाम तत्तुल्यं रामनाम वरानने ।
इति श्रीबुधकौशिकमुनिविरचितं श्रीरामरक्षास्तोत्रं संपूर्णम् ।
श्री सीतारामचंद्रार्पणमस्तु । शुभं भवतु ।